दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -२६२ | रविवार,दि.२५ मे २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-262 | Sunday, Dt.25 May 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4


# बीडवासियांच्या देशभक्तीने ओथंबलेली शिवसेनेची भव्य तिरंगा रॅली संपन्न !

## मंत्री संजय शिरसाट यांनी तिरंगा रॅलीस हिरवा झेंडा दाखवून केला प्रारंभ

प्रतिनिधी @ बीड

नापाक पाकचे मनसुबे उद्ध्वस्त करणारे ऑपरेशन सिंदूर यशस्वीपणे राबवणाऱ्या भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ काल शनिवार दि २४ मे २०२५ रोजी दु. १२: ०० वाजता महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते मा. ना. संजयजी शिरसाट साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत बीडवासियांच्या देशभक्तीने ओथंबलेली शिवसेनेची भव्य तिरंगा रॅली संपन्न झाली. या तिरंगा रॅलीत बीडवासियांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला तर या रॅलीत युवकांनी ट्रॅक्टरमध्ये सैनिकांची वेशभूषा परिधान करून आपले देशप्रेम व्यक्त केले. याबरोबरच असंख्य तरुण हाती तिरंगा झेंडा घेऊन भर पावसात भारत माता की जय, वंदे मातरम या घोषणा देत मोटारसायकलवर स्वार झाले होते.






मंत्री ना. संजयजी शिरसाट साहेब यांनी सर्वोप्रथम विश्ववंदनीय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तिरंगा रॅलीस हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा प्रारंभ केला. यानंतर लागलीच शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांच्यासह तिरंगा रॅलीत सहभागी झाले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत ही भव्य रॅली काढण्यात आली. सर्वांनी मिळून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आणि नंतर सीमारेषेवर मातृभूमीसाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण केली. देशाच्या मातीसाठी, आपल्या लेकरांसाठी, आपल्या भविष्यासाठी आपल्या प्राणांची तमा न बाळगता लढणाऱ्या भारतीय सैन्याला अभिवादन करण्याकरिता भर पावसात बीडमधून प्रतिष्ठित नागरिक तथा असंख्य तरुण राष्ट्रीय ध्वज हाती घेऊन रॅलीत सहभागी झाले होते, यावरून बीडकरांच्या निस्सीम देशभक्ती आणि देशप्रेमाचे दर्शन घडून आले.


याप्रसंगी शिवसेना विभागीय सचिव अशोकपटवर्धन साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बाप्पूसाहेब मोरे, माझे सहकारी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, युवासेनेचे बाजीराव चव्हाण, विपुल पिंगळे, अविनाश जाधव, सागर बहिर, अलकाताई डावकर, चंद्रकलाताई बांगर, रविराज बडे, सुजित शिंदे, गणेश शिराळे, मनोज चव्हाण यांच्यासह शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, एसटी कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी-माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धनंजय मुंडेंना क्लीनचिट मिळाली तर मी राजीनामा देईन

## त्यांना मंत्रिमंडळात घ्यायचे ठरले तर माझी काही हरकत नाही, छगन भुजबळांचे मोठे विधान

नाशिक /प्रतिनिधी

उद्या जर धनंजय मुंडे यांना क्लीनचिट मिळाली तर आपण मंत्रिपदाचा राजीनामा देऊ, असे विधान मंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे. राज्याच्या मंत्रिमंडळात नव्यानेच छगन भुजबळ यांच्याकडे मंत्रिपद देण्यात आले आहे. तसेच काँग्रेस जेव्हा फुटली तेव्हा मला मुख्यमंत्रीपदाची ऑफर होती, पण मी शरद पवारांसोबत गेलो, असेही भुजबळ यांनी म्हटले आहे.



एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना छगन भुजबळ यांना प्रश्न विचारण्यात आला की धनंजय मुंडे पुन्हा मंत्रिमंडळात आले तर तुम्ही काय करणार? यावर उत्तर देताना भुजबळ म्हणाले, उद्या जर धनंजय मुंडे यांना क्लीनचिट मिळाली तर आपण मंत्रिपदाचा राजीनामा देऊ. धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळात घ्यायचे ठरले तर माझी काही हरकत नाही. मी या मंत्रिमंडळात पुन्हा आलो आहे, सन्मानाने मला परत बोलावले. धनंजय मुंडे सगळ्यातून मुक्त झाले, त्यांची सगळी लाईन क्लियर झाली तर मी राजीनामा देईन.

### अजित पवारांशी अबोला धरला होता

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, जेव्हा मंत्रिपद मिळाले नव्हते तेव्हा अनेक विचार येत होते आणि खंत वाटत होती. मी आणि अजितदादा बोलत नव्हतो. अजितदादांच्या घरच्या कार्यक्रमाला गेलो नाही. पण मी पक्षाच्या प्रत्येक कार्यक्रमात मी उपस्थित राहिलो, असे म्हणत भुजबळ यांनी अजित पवारांशी अबोला धरला होता असे कबूल केले आहे.

### भाजपसोबत जायचे आधीच ठरले होते

छगन भुजबळ म्हणाले, शरद पवारांनी जेव्हा अध्यक्षपदाचा राजीनामा दिला तेव्हा सुप्रियाला पक्षाचे अध्यक्ष करायचे, सरकारमध्ये जायचे असे ठरले होते. यामध्ये पवार साहेब कुठेच असणार नाहीत असेही ठरले होते. युतीची सर्व चर्चा करायला जयंत पाटील, अजित पवार आणि प्रफुल पटेल जात होते. भाजपबरोबर जावे यासाठी आमच्या अनेक बैठका झाल्या. त्यामध्ये अनिल देशमुखही होते.

## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त भाजपाच्या वतीने

# राज्यस्तरीय भव्य निबंध स्पर्धा - नवनाथ अण्णा शिराळे

प्रतिनिधी @ बीड

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भव्य ऑनलाइन राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

केवळ एक राजमाता नव्हे, तर समाजहितासाठी झटणारी एक जागृत सेविका त्या होत्या. त्यांनी काशीपासून रामेश्वरापर्यंत मंदिरे, घाट, विहिरी आणि धर्मशाळांची उभारणी केली - त्या केवळ इमारती नव्हत्या, तर संस्कृतीच्या आधारस्तंभ होत्या.त्यांच्या कार्याचा विस्तार हा केवळ राज्यकारभारापुरता मर्यादित नव्हता, तर त्यात धर्म, न्याय, आणि मानवसेवेचे मूल्य होते. अशा या आदर्श स्त्रीशक्तीला आज आपण मानाचा मुजरा करतो कारण अहिल्याबाई म्हणजे दिव्यतेची आणि नेतृत्वाची जिवंत मूर्ती होत्या.याच दिव्यत्वाला नमन करण्यासाठी त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने भव्य अशा राज्यस्तरीय ऑनलाईन निबंध स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेची वैशिष्ट्ये म्हणजे, भव्य राज्यस्तरीय निबंध स्पर्धा,२. मराठी, हिंदी आणि इंग्रजी ही तिन्ही माध्यम,३. भव्य दिव्य पारितोषिके,४. सर्व सहभागींना सहभागीत्व प्रमाणपत्र,५. सर्व वयोगटांना संधी,६. कोणत्याही स्पर्धकाला केवळ एकाच स्पर्धेत भाग घेता येईल.

महत्त्वाच्या तारखा १. दि.२५ मे ते ३० मे २०२५ - नाव नोंदणी आणि दिलेल्या लिंकवर निबंध स्पर्धेचे पीडीएफ पाठविणे.,२. दि. ०५ जून २०२५ वेबसाईटवर निकाल जाहीर,३. पारितोषिक वितरणाची तारीख विजेत्यांना कळविण्यात येईल आणि सहभागींना ३० जून २०२५ च्या आत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येतील.अधिक माहितीसाठी संपर्क ९८२१७०४३५०, ९०८२५२८५६८, ८०८२७६२१६२ या नंबर वर संपर्क करावा असे आवाहन आयोजन भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी दिपक काळकुटे

प्रतिनिधी @ बीड

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत बीड जिल्हा ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी दैनिक सूर्योदयाचे उपसंपादक दीपक काळकुटे यांची सर्वांमध्ये निवड करण्यात आली. त्यांच्याकडे शिरूर कासार आष्टी पाटोदा




आणि गेवराई या तालुक्यांची जबाबदारी देण्यात आली आहे.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक संजय भोकरे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंदजी वाकडे सर, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे साहेब यांच्या आदेशावरून प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली बीड येथील शासकीय विश्रामगृह याठिकाणी शनिवार २४ मे रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकी मध्ये पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगर येथे होत असलेल्या १५ जून रोजी विभागीय अधिवेशन संदर्भात सविस्तर चर्चा झाली. तसेच पत्रकार संघाचा बीड जिल्हास्तरीय मेळावा ५ सप्टेंबर रोजी घेण्याचे निश्चित झाले. यासह विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी सर्वांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी दिपक काळकुटे यांची निवड करण्यात आली.निवड होताच सर्वांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. तसेच दैनिक सूर्योदय कार्यालय बीड याठिकाणी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर, दैनिक सूर्योदयचे मुख्य संपादक गंगाधर (नाना ) काळकुटे, बीड जिल्हाध्यक्ष अमजद खान,जिल्हा सचिव शेख वशिम,महिला जिल्हाध्यक्षा शेख आयेशा,बीड जिल्हाध्यक्ष विनायक जाधव,महिला सचिव मोरे अनुप्रिता,पत्रकार संघाचे गेवराई तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे,संघाच्या डिजिटल मिडियाचे जिल्हाध्यक्ष अनिल आगुंडे,केज तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील,वडवणी डिजिटल मीडियाचे तालुकाध्यक्ष सतिष मुझमुले,पत्रकार विष्णू राठोड,सरपंच भास्कर हातागळे, व्यवस्थापक प्रवीण वडमारे,शंकर झाडे,शेख एजाज, सोमेश्वर सोनटक्के, एस. एम. पुसरेकर,अंकुश गवळी यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

## नामच्या कामाचे सर्वत्र कौतुक - अँड. अजित देशमुख

# मस्साजोगची नदी पाण्याने खचाखच भरली

प्रतिनिधी @ बीड

नाम फाउंडेशन मार्फत मोफत मशीन आणि मोफत डिझेल देऊन येथील जवळपास तीन किलोमीटर अंतरावरील नदीमध्ये खोलीकरण आणि रुंदीकरण करण्यात आले. मे महिन्यात आलेल्या अवकाळी पावसाने ही नदी खचाखच भरली असून परिसरातील गावातील शेतकऱ्यांनी नामचे कौतुक केले आहे. आज जनआंदोलनाचे विश्वस्त ड. अजित एम. देशमुख यांनी या साठलेल्या पाण्याची पाहणी केली.

सलग तीन किलोमीटर पाणी साठणार असल्याने आता या गावातील शेतकऱ्यांना फार मोठी ऊर्जा मिळाली आहे. शेतकऱ्यांना दोन पिके बिनधास्त घेता येतील आणि प्रत्येक वर्षी या पाण्याचा फायदा घेता येईल. दोन दिवसात झालेल्या पावसाने अनेकांच्या विहिरीत पाणी आले असून अनेकांची बंद पडलेले पाण्याचे बोअर देखील चालू झाले आहेत, असेही ग्रामस्थांनी यावेळी सांगितले.

नदीत साठलेले पाणी पाहण्यासाठी शेतकऱ्यांचा ओढा वाढला असून एक वेगळा आनंद परिसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसत आहे. त्यामुळे नाम फाउंडेशनच्या कामाचे अनेक जण कौतुक करत आहेत. या गावातून जाणारी नदी खोलीकरण आणि रुंदीकरणाचे काम गेल्या दीड महिन्यापूर्वी नामने हाती घेतले होते. आणखी काही दिवस काम चालले असते. परंतु दररोज पडत असलेल्या पावसामुळे मशीन चांगल्या पद्धतीने काम करू शकत नव्हती. त्यामुळे आणि



ठरल्याप्रमाणे सर्व काम पूर्ण झाल्यामुळे नामच्या कामाला यश आले आहे. या कामावर ड. अजित देशमुख यांनी सातत्याने लक्ष दिले. आणि काम चांगले व्हावे यासाठी प्रयत्न केले.

पाणी अडवण्यासाठी नदीचे रुंदीकरण शक्य तेवढे मोठ्या प्रमाणात करण्यात आले असून खोलीकरणात देखील काही ठिकाणी पंधरा फूट पाणी साठले आहे. आणखी पाणी साठण्याची मोठी क्षमता त्या ठिकाणी आहे. त्यामुळे पाणीसाठा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाला आहे. या पाहणीच्या वेळी भागवत कदम, तुषार देशमुख, मंगेश देशमुख, मोरे यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

# वेळेच्या ८ दिवस आधीच केरळमध्ये पोहोचला मान्सून

## १६ वर्षांत सर्वात लवकर; २८ राज्यांत वादळ-पाऊस आणि उष्णतेचा रेड अलर्ट

नवी दिल्ली/भोपाळ/लखनऊ

आज केरळमध्ये मान्सून दाखल झाला आहे. तो १ जून या त्याच्या नियोजित वेळेच्या ८ दिवस आधी केरळमध्ये पोहोचला आहे. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, १६ वर्षांत पहिल्यांदाच मान्सून इतक्या लवकर पोहोचला आहे. २०२४ मध्ये तो ३० मे रोजी केरळमध्ये पोहोचला.तो देशापासून सुमारे ४०-५० किलोमीटर अंतरावर चार दिवस अडकला होता आणि शुक्रवारी संध्याकाळी पुढे सरकला. आजच तो तामिळनाडू आणि कर्नाटकच्या अनेक भागात पोहोचण्याची अपेक्षा आहे. त्याच वेळी, तो एका आठवड्यात देशाच्या दक्षिण आणि ईशान्य राज्यांना व्यापू शकतो. तो ४ जूनपर्यंत मध्य आणि पूर्व भारतात पोहोचेल.



याशिवाय, विभागाने आजसाठी दोन प्रकारचे रेड अलर्ट जारी केले आहेत. पहिला मुसळधार पावसाचा आणि दुसरा अति उष्णतेचा. गुजरात, गोवा, महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळच्या किनारी भागात २०० मिमी पर्यंत पाऊस पडू शकतो. पुढील सात दिवस या राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

तसेच, आज देशातील एकूण २९ राज्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशात, गेल्या तीन दिवसांत वादळ-पावसाशी संबंधित घटनांमध्ये मृतांचा आकडा ६० वर पोहोचला आहे.त्याच वेळी, राजस्थानच्या पश्चिम भागात २७ मे पर्यंत उष्ण वाऱ्यांमुळे रेड अलर्ट आहे. शुक्रवारी जैसलमेरमध्ये कमाल तापमान ४८ अंश होते. आज ते आणखी वाढू शकते.

राज्यात यावेळी नौतपादरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने पुढील सात दिवस वादळ आणि पावसाचा इशारा जारी केला आहे. याचे कारण राज्यातील चक्रवाती अभिसरण आणि ट्रफ ॲक्टिव्हिटी आहे. आज भोपाळ, इंदूर, ग्वाल्हेर, जबलपूर, उज्जैनसह एकूण ४७ जिल्ह्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

राज्यातील हवामान सतत बदलत आहे. आज ६५ जिल्ह्यांमध्ये पाऊस आणि विजांचा इशारा देण्यात आला आहे.

### २७ मेपर्यंत समुद्रात जाण्यास बंदी

हवामान खात्याने केरळच्या किनारी आणि अंतर्गत भागात वादळाचा इशारा जारी केला आहे. मच्छिमारांसह सामान्य लोकांना खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. केरळ, कर्नाटक आणि लक्षद्वीपच्या किनाऱ्यावर २७ मे पर्यंत मासेमारीसाठी समुद्रात जाण्यास बंदी घालण्यात आली आहे.


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

Bureau of Indian Standards

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

## संपादकीय

### मेल्यानंतर दहावा, तेरावा, मास आणि श्राद्ध यापलीकडे काहीच नसते...

बऱ्याच लोकांचा असा गैरसमज असतो जास्त करून गावखेड्यात राहणाऱ्या लोकांचा की पुणे मुंबई किंवा मोठी शहरे म्हणजे ताऱ्यांची दुनिया, पुणे मुंबई म्हणजे लकलखते आकाश, पॉश, स्वच्छ, आनंद, सुख समृद्धी आणि श्रीमंत असून समाधानी लोकांची शहरे काही प्रमाणात ते खरे ही आहे मग पृथ्वी वर तुम्ही कुठे ही रहा.

किती गोष्टी आपल्याला लागतात त्यापेक्षा किती गोष्टी मध्ये आपण समाधानी राहायचे किंवा राहतो यावर पूर्ण आयुष्य अवलंबून आहे. आपल्याकडे २००० मागणारा मित्र आणि २००००० मागणारा मित्र तसे सेमच असतात पण त्या केलेल्या मदतीचा वापर कोण कशासाठी करत असतो त्यावर त्याला मदत करायची की नाही हे ठरते. पार्टी मध्ये बसून जरा २००० पाठव रे बिल जास्त झाले म्हणणाऱ्या मित्राला मदत करताना घेतलेला पॉज ही खूप महत्वाचा असतो आणि शेतकरी किंवा होतकरु मित्राला २०००० एका क्लिक मध्ये पाठवणे हे ही खूप महत्वाचे ठरते. आपण हजार कमवत असेल तर लाख आणि लाख कमवत असाल तर करोड़ देण्याची तयारी ठेवणरे  मित्र बनवणे हे ही खूप महत्वाचे आहे आणि तसे नसेल तर आपला आयुष्याचा हिशोब कुठे तरी चुकतोय हे मान्य केले पाहिजे. सांगायचा मुद्दा हा आहे की,

आपल्याकडे आहे त्यामध्ये काटकसर करून आयुष्य जगणे हे जरी महत्वाचे असले तरी नसलेल्या गोष्टी साठी प्रयत्न करणे आवश्यक असते.कालच एक क्लिप पाहिली की मिडल क्लास व्यक्ती फक्त त्याच्या शेजारच्याला किवा मित्र नातेवाईकांना मी किती श्रीमंत किंवा मोठा आहे हे दाखवण्यासाठी कर्जबाजारी बनतो.

काही प्रमाणात खरे ही असेल पण फक्त मिडल क्लास च नाही तर प्रत्येक व्यक्ती साधारण ९५% तरी हेच करत असतात. हे सर्व करत असताना एक व्यक्ती या सर्व गोष्टी मध्ये भरडली जाते ती म्हणजे स्त्रीज्यामध्ये तिचा काडीचा ही संबंध नसतो. निघेल तेवढे प्रेमाने,नाही दिले तर ओरबडून,आणि मग त्यासाठी कोणत्या ही थराला जाणाऱ्या औलादी ही आपल्याकडे कमी नाहीत.

ऐवढे सर्व होऊन जर सर्व सहजपणे झाले तर ठीक नाही तर पुरूषांचे शेवटचे आणि प्रभावी हत्यार म्हणजे तिचे चारित्र.खरी गफलत होते ती इथे. स्वतःची इज्जत सांभाळायची की समाजा मधले स्थान हा काय म्हणेल आणि तो काय म्हणेल या मध्ये ती पार विस्कटून जाते. नवीन लग्न ते ही प्रेम विवाह लाखोंचे सोने कैश आलिशान गाडी महागडा मोबाईल प्रत्येक सणाला सोन्याच्या वस्तू महागडे गिफ्ट कपडे शिवाय जाताना लाख लाख रुपये हे सर्व पाहून असे वाटते की हे नाते आहे की व्यवहार ? बाकी सर्व काही असू द्या एवढे सगळे असून जी स्त्री १ वर्षाच्या बाळाचा विचार न करता आत्महत्या करते ,

तिला कोणत्या टोकापर्यंत त्रास झाला असेल ही कल्पना करणे म्हणजे केवळ अशक्य. शिवाय ही गोष्ट पटत ही नाही कारण आई आपल्या मातृत्वासाठी एका सेकंदात करोडोंची संपत्तीला लाथ मारून बाहेर पडू शकते. यामधल्या अनेक गोष्टी ह्या आपल्याला माहीत नाहीत त्या समोर येतील,तिच्या नवऱ्याला बायको परत येईल, त्या घराला सून परत येईल,

पण ज्या आईवडिलांनी आपले लेकरू गमावले आहे ते कधीच  परत येणार नाही हे त्रिकाल सत्य आहे. नवविवाहित किंवा समस्थ स्त्री वर्गाला हाथ जोडून नम्र विनंती आहे की ज्यावेळी जगणे असहाय्य होईल आणि जेव्हा मनात शेवटचा आत्महत्येचा विचार येईल तेव्हा सरळ पूर्ण दुनिया जाग्यावर सोडून खूप दूर निघून जा आणि पुढचे आयुष्य कोणाच्या ही विचार न करता स्वच्छंद पणे जगा. कारण मेल्यानंतर दहावा तेरावा मास आणि श्राद्ध यापलीकडे काहीच नसते पण आत्महत्या न करता नवीन मिळालेल्या आयुष्यात खूप काही असते हे जेव्हा समस्त स्त्री वर्गाला समजेल तेव्हा हे कुठे तरी थांबेल हे नक्की.

### टी.सी.हरवली आहे

शामल वासुदेव गर्जे यांच्या दहावी पास चा टिसी पाटोदा ते बीड प्रवास दरम्यान हरवलं आहे सापडल्यास
संपर्क-८१८०८ ४८३६५



प्रतिनिधी @ केज

केज नगरपंचायत येथे रमाई आवास योजना व पंतप्रधान आवास योजना अंतर्गत ८५ लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी प्रमाणपत्र व हप्ते वाटप करण्यात आले याप्रसंगी उपस्थित राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार,केज नगर पंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड, गटनेते राजूभाई इनामदार,नगरसेवक जलालभाई इनामदार, गटनेते भाऊसाहेब गुंड, नगरसेविका पद्मिनी अक्का शिंदे,किसन दादा कदम,एम.डी.घुले सर,लखन हजारे,बबलू भैय्या साखरे, इंजि ज्योतिबा घाडगे, भीमराव मस्के इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते.



माहेश्वरी सभेच्या वतीने श्रेया गणेश लोहिया हीने १०वीत ८८ टक्के गुण मिळवुन विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्या बद्दल सत्कार व कौतुक करण्यात आले असता माहेश्वरी सभेचे पदाधिकारी बांधव होते.

# शिक्षक वाचन समृद्धी २०२५ हा उपक्रम राज्य पातळी पर्यंत पोचावा- अभिजीत जोंधळे

## शिक्षक मैत्री प्रतिष्ठाण व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचा संयुक्त उपक्रम

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई व शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या शिक्षक वाचन समृद्धी उपक्रम २०२५ हा उपक्रमाची चळवळ होऊन ती वाढत जाऊन राज्य पातळीपर्यंत पोचावी व समस्त महाराष्ट्राला वाचनाची आवड निर्माण व्हावी असे प्रतिपादन अभिजीत पुस्तकालयाचे संचालक व अंबाजोगाई तालुक्यातील वाचन चळवळीतील अग्रगण्य साहित्यिक अभिजीत जोंधळे यांनी उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी केले. यावेळी व्यासपीठावर अभिजित जोंधळे, महाराष्ट्र राज्य राजपत्रित संघटना, डायटचे अध्यक्ष डॉ योगेश सुरवसे, प्राचार्य डॉ इब्राहिम नदाफ, श्रीधर नागरगोजे हे होते.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे येथील संचालक राहुल रेखावार यांच्या प्रेरणेतून जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई जिल्हा बीड व शिक्षक मैत्री प्रतिष्ठान  अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी शिक्षक वाचन समृद्धी उपक्रम २०२५ हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यामध्ये राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद पुणे ,महाराष्ट्र  यांनी निर्देशित केलेल्या ५१ शिक्षण विषयक पुस्तकांचा अभ्यास करून त्याचे सारांश रूप शिक्षकांनीच इतर शिक्षकांसमोर मांडणी करणे व त्याचा आपल्या शालेय व्यवस्थापनात व दैनंदिन अध्यापनात कसा उपयोग होईल याबाबत सविस्तर विवेचन करणे असे या कार्यक्रमाचे स्वरूप आहे. हा अभिनव उपक्रम जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई चे अधिव्याख्याता  तथा महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी संघटना डायटचे राज्य अध्यक्ष डॉ योगेश सुरवसे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आला आहे.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता डॉ. योगेश सुरवसे व प्राचार्य डॉ. इब्राहिम नदाफ साहेब, त्याचबरोबर शिक्षक मैत्री प्रतिष्ठान ,अंबाजोगाई यांच्या अनमोल सहकार्य व बळावर संपूर्ण वर्षभर आयोजित करण्याचे ठरवण्यात आले आहे. या उपक्रमात पुस्तकाचे विश्लेषण सादर करणाऱ्या शिक्षकांना विशेष सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात येते. या



कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना अधिव्याख्याता डॉ. योगेश सुरवसे यांनी या उपक्रम आयोजित करण्या पाठीमागची भूमिका विशद केली

या उपक्रमाचे दुसरे पुष्प हे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई येथे  दिनांक २३ मे रोजी गुंफण्यात आले.या मध्ये जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, राडी ता . अंबाजोगाई येथे कार्यरत असणारे शिक्षक श्रीधर नागरगोजे यांनी मानव जातीचे इतिहासाची मर्मभेदी मांडणी करणारे आणि भविष्यातील थरारक शक्यतांची भाकीत करणारे युव्हाल नोआ हरारी लिखित सेपिअन्स या पुस्तकावर सारांश रूपात भाष्य केले. तर  . कै दे. बा. गणगे योगेश्वरी नूतन  प्राथमिक विद्यालय, अंबाजोगाई येथे  कार्यरत असणारे  उपक्रमशील शिक्षक किरण राऊतमारे यांनी रेणू दांडेकर लिखित डॉ कलामांची दशसूत्री या पुस्तकावर सारांश रूपात भाष्य केले. दोन्ही शिक्षक वाचक मित्रांनी अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने या पुस्तकाचा उपयोग शिक्षण पद्धतीत व अध्यापनात कसा करता येईल याची मांडणी केली.

यावेळी दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी शिक्षक वाचक मित्र म्हणून पुस्तकांचे समीक्षण करून अभ्यासपूर्ण मांडणी करणाऱ्या शिक्षक वाचक मित्र श्रीमती प्रा सविता सोमनाथ बुरांडे , स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय अंबाजोगाई यांचा उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र सन्मानचिन्ह,शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती असलेल्या अभिजीत पुस्तकालयाचे संचालक व वाचन चळवळीतील अग्रगण्य साहित्यिक अभिजीत जोंधळे यांनी उपस्थितांना आपल्या खुमासदार शैलीत आपल्या दैनंदिन जीवनात वाचनाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. तसेच शिक्षक मैत्री प्रतिष्ठान तसेच जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेच्या वतीने राबविण्यात येत असलेला शिक्षक आव्हान समृद्धी हा उपक्रम महाराष्ट्र भर राबविला जावा असे मत अभिजित जोंधळे यांनी  याप्रसंगी व्यक्त केले.

# सस्ती अदालत उपक्रमातून ५६० शेतरस्ते व पाणंद रस्ते मोकळे

## विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांचा विशेष पुढाकार

प्रतिनिधी @ छत्रपती संभाजीनगर

मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते तसेच पाणंद रस्ते मोकळे करण्यासोबतच प्रलंबित प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी छत्रपती संभाजीनगर विभागामधील सर्व तालुक्यात सस्ती अदालत उपक्रम सुरू आहे. विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या उपक्रमामुळे समूपदेशनातून तब्बल ५६० शेतकऱ्यांची प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली आहेत. प्रशासन थेट बांधावर पोचल्याने शेतरस्ते मोकळे करून देण्यात यश आले आहे.

राज्यातील जे शेतरस्ते, पाणंद रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेतजमिनीमध्ये वहिवाट करण्यासाठी अस्तित्वात असलेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत. अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण होऊन तक्रारही होतात. राज्यातील सर्वच शिवपाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करून त्यांची कामे दर्जेदाररीत्या पूर्ण करावी, शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करावी, शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते. अशी रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढावीत. असे स्पष्ट आदेश राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.महसूलमंत्री श्री बावनकुळे यांच्या सूचनेनुसार मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील गरजू नागरिक शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते व पाणंद रस्ते मोकळे करण्यासोबतच जलद न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी शासनाच्या सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रत्येक माहिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शुक्रवारी शक्यतो तहसिल कार्यालयात किंवा गरजेनुसार मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी  सस्ती अदालत या नावाने हा उपक्रम सुरू आहे. विभागात ९ मे रोजी प्रथम सस्ती अदालत व २३ मे रोजी दुसरी सस्ती अदालत तहसिल कार्यालयात तसेच गरजेनुसार मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी घेण्यात आली. सस्ती अदालतीमध्ये काही प्रकरणात प्रत्यक्ष बांधावर जाऊन स्थळ पाहणी करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनीदेखील अदालतीमध्ये ऑनलाईन सहभागी होत नागरीकांशी संवाद साधला. छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या संकल्पनेतून कमी खर्चात आणि कमी वेळात शेतकऱ्यांचे रस्ते मोकळे करून देण्याची सस्ती अदालत योजना परिणामकारक ठरते आहे.



शेतकरी हिताच्या दृष्टिकोनातून दोनशे रुपयात शेताच्या हद्दीची मोजणी या निर्णयाला गती देण्यासाठी विभागीय आयुक्त श्री गावडे यांनी विभागातील आठही जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांची दूरदृष्यप्रणालीद्वारे विभागीय आयुक्त यांनी बैठक घेतली आहे.गरजू शेतकऱ्यांचा जास्तीत जास्त फायदा करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. तरी या अदालतीचा गरजू शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे अवाहन विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनी केले आहे.

जिल्हानिहाय शेतरस्ते आकडेवारी अशी..

छत्रपती संभाजीनगरमध्ये प्राप्त १४१, निकाली ४४ तर शिल्लक प्रकरणे ९७ जालना - प्राप्त १०९, निकाली ३८ तर शिल्लक प्रकरणे ७१ परभणी- प्राप्त २४२, निकाली १४२ तर शिल्लक प्रकरणे १०० हिंगोली- प्राप्त ६१, निकाली २५ तर शिल्लक प्रकरणे ३६ नांदेड- प्राप्त १५३, निकाली ५९ तर शिल्लक प्रकरणे ९४ बीड- प्राप्त १२८, निकाली ५३ तर शिल्लक प्रकरणे ७५ लातूर- प्राप्त २७८, निकाली १६२ तर शिल्लक प्रकरणे ११६ धाराशिव- प्राप्त १६८, निकाली ३७ तर शिल्लक प्रकरणे १३१ एकूण- प्राप्त १२८०, निकाली ५६० तर शिल्लक प्रकरणे ७२०



# दौनापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कमानीला परवानगी द्यावी

## अन्यथा २६ मे रोजी तहसील कार्यालयावर भव्य निदर्शने - गौतम साळवे

प्रतिनिधी @ परळी


परळी तालुक्यातील दौनापूर येथे महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कमानीस परवानगी मिळावी यासाठी परळी तालुक्यातील तमाम आंबेडकरी समाजाच्या वतीने दिनांक २६ मे रोजी परळी तहसील कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात येणार असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष गौतम साळवे यांनी सांगितले आहे. या निदर्शनात परळी तालुक्यातील आंबेडकरी पक्ष, संघटना, कार्यकर्ते व समाज मोठ्या संख्येने सहभागी होणार आहे.

याबाबत परळी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,दौनापूर  येथील बौद्ध समाज दिनांक २० मे पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसला आहे. तरीही अद्याप गेंड्याच कातडे पांघरलेल्या प्रशासनाने कमानीस परवानगी दिलेली नाही.दौनापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक, आहिल्याबाई होळकर चौक, संत भगवान बाबा चौक आदी महामानवांच्या नावाने चौक आहेत. परंतु समाजाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कमानीला परवानगी मागितली असता जातीवादी सरपंच आणि ग्रामपंचायतीने जातीय द्वेषाने परवानगी नाकारली आहे त्यामुळे संपूर्ण बौद्ध समाजाचा व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ग्रामपंचायतीने अवमान केलेला आहे.

तरी आपण दोन दिवसात परवानगी द्यावी अन्यथा दिनांक २६ मे रोजी सकाळी ११ वाजता आपल्या कार्यालयासमोर तमाम आंबेडकरी समाजाच्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात येतील. या निवेदनात परळी तालुक्यातील आंबेडकरी समाज मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, तालुका अध्यक्ष गौतम साळवे, युवक अध्यक्ष राजेश सरवदे, युवा नेते धम्मा क्षिरसागर,संदीप ताटे आदी उपस्थित होते.

# माऊली चाकरवाडी कथेला सक्तीच्या देणगीची गरज नाही भक्तीची देणगी पाहिजे

**प्रतिनिधी @ माजलगांव**



बीड जिल्हा मराठवाडा, महाराष्ट्र या भागात ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांचे कोटी भक्त आहेत.कथेला सात दिवस वीस लाख लोक येथील असा अंदाज आहे.वीस लाख लोकांनी माऊलींच्या चरणी कथेसाठी यथाशक्ती देणगी अर्पण करावी. असे आवाहन माऊली भक्त संतोषबापु जेथलिया यानी केले आहे .वीस लाख लोक शंभर,पाचशे, हजार या पद्धतीने देणगी देतात .हा देणगीचा आकडा पंचेवीस कोटी होईल जो भक्तांच्या परिश्रमातुन जमा होणार आहे.माऊली चे मंदिर चरणी, महादेव महाराज यांच्या कडे सामान्य माणसांनी देणगी द्यावी.प्रत्येक गावाने जमा केलेली रक्कम माऊली चरणी अर्पण करावी.सक्तीच्या आणि मोठ्या रक्कमेतुन कथा कधीच यशस्वी होत नाही, झालेली नाही.सामान्य माणसाचा लोकसहभाग कथा यशस्वी करत असतो.सामान्य माणसांनी यथा शक्ती कथा यशस्वी करण्यासाठी सहभाग नोंदवावा.सामान्य माणसाला ज्यांनी शिव भक्तीला लावले.शिव मंदिरात गर्दी फुलवली असे संत प्रदीप जी मिश्रा यांच्या गोड वाणीतुन ,भक्तीचा गजर असणार्या चाकरवाडी या ठिकाणी भव्य कथेचे आयोजन केले आहे .त्या कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन संतोषबापु जेथलिया यांनी केले आहे.अविरत अन्नदान चाकरवाडी येथे चालु असते.अशा ठिकाणी देणगी,मदत यांची कधीच कमी पडली नाही

# आष्टीत कृषि विभागाचे आवाहन; किडरोगांच्या प्रादूर्भावाचा करावा लागेल सामना



**प्रतिनिधी @ आष्टी**

अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे यंदा मे महिन्यातच वरूणराजाने राज्यभरात जोरदार हजेरी लावली आहे. यामुळे शेतकरी वर्ग पेरण्या उरकून घेण्याच्या तयारीत आहे. मात्र, कृषि विभागाने शेतक-यांना सावधानतेचा इशारा दिला असून हंगामापूर्वी पेरणी केल्यास पिकांवर किडरोगांचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता असल्याने ता. ५ जूननंतरच पेरण्यांना सुरूवात करावी, असे आवाहन कृषि विभागातर्फे करण्यात आले आहे.

वेळेपूर्वीच म्हणजे २७ मे रोजी केरळमध्ये दाखल होणार आहे. ही बाब अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे, कारण सामान्यतः दरवर्षी मान्सून १ जूनच्या आसपास केरळमध्ये पोहोचतो. यंदा तीन दिवस आधी मान्सून येणार असल्याने हवामान खात्याने दिलेली ही माहिती शेतकरी आणि पावसावर अवलंबून असलेल्या उद्योगांसाठी आशेची किरण घेऊन आली आहे.

महाराष्ट्रातील नागरिक, विशेषतः शेतकरी बांधव सध्या मान्सूनच्या प्रतीक्षेत आहेत. सामान्यतः महाराष्ट्रात मान्सून ७ जूनच्या आसपास दाखल होतो. मात्र यंदा केरळमध्ये २७ मे रोजी मान्सून दाखल होणार असल्यामुळे महाराष्ट्रातही पाऊस लवकर सुरू होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार ४ ते ६ जून दरम्यान मान्सून महाराष्ट्रात पोहोचू शकतो. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी आवश्यक तयारी सुरू केली असून सध्या सर्वदूर कोसळत असलेल्या पावसामुळे बी - बियाण्यांची खरेदी, जमिनीची मशागत आणि सिंचन नियोजनात शेतकरी वर्ग व्यस्त आहे.

आष्टी तालुक्यात सध्या सरासरी १५० मी. मी. पाऊस झाला असून तो पेरणीसाठी समाधानकारक आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाने पेरण्या उरकून घेण्याची तयारीही सुरू केली आहे. मात्र, कृषि विभागाने शेतक-यांना सावधानतेचा इशारा दिला असून हंगामापूर्वी पेरणी केल्यास पिकांमध्ये गोगलगायी, पैसा, खोडमाशी या किडी तर मुग, उडीद, सोयाबीन या पिकांवर पिवळा मोझॅक या रोगाचा प्रादूर्भाव मोठ्या प्रमाणात होऊ शकतो, असा धोक्याचा इशारा कृषि विभागाकडून देण्यात आला आहे.

### तण व्यवस्थापनासाठी पाळी मारूनच करा पेरणी

दरम्यान, यंदा मे महिन्यात जोरदार पावसाने हजेरी लावल्याने शेतामध्ये तण वाढणार असल्याने पावसाने उघडीप दिल्यानंतर शेतक-यांनी तण व्यवस्थापनासाठी शेतामध्ये पाळ्या मारून घ्याव्यात. शेतक-यांनी पाळी घालून पेरणी केल्यास किड व रोगांपासून पिकांचे संरक्षण होईल, असा सल्ला कृषि तज्ज्ञांनी दिला आहे.

### हंगामी पेरणी, बीजप्रक्रियाही महत्त्वाची

शेतकरी वर्गाने हंगामी पेरणी करत असताना बियाणाला किटकनाशक व बुरशीनाशक व जैविक खते यांची बीजप्रक्रिया करूनच पेरणी प्रक्रिया करावी. बीजप्रक्रिया करून पेरणी केल्यानंतर पिकांचे संरक्षण होण्याबरोबरच उत्पन्नातही वाढ होते. (गोरख तरटे, तालुका कृषि अधिकारी, आष्टी)

# रोषनपुरी ते छोटीवाडी रस्ता कामासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उपोषण


**प्रतिनिधी @ माजलगांव**



रोषनपुरी ते छोटीवाडी रस्ता कामासाठी दि. २३ मे रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे, दिलीप धोत्रे, संतोष नागरगोजे, अशोक तावरे, जिल्हाध्यक्ष श्रीराम बादाडे यांच्या आदेशाने तालुकाध्यक्ष धोंडीराम जाधव यांच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण करण्यात आले. रोषनपुरी ते छोटीवाडी रस्ता कामाचे मजबुतीकरण व खडीकरण करा यासाठी उपोषण करण्यात आले. दरम्यान या उपोषणाची जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग माजलगाव येथील उपअभियंता यांनी दखल घेत रोषनपुरी ते छोटीवाडी रस्ता काम करण्यासाठी वरिष्ठाकडे नव्वद लाखाची मागणी केल्याचे पत्र दाखवून लवकरात लवकर हे काम मार्गी लावू असे आशयाचे पत्र दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी पी. आय. कोळी साहेब उपस्थित होते. उपोषणात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष धोंडीराम जाधव, बालाजी जाधव, आशोक ताकट, अभिजीत जाधव, सोनाजी जाधव, नाना ताकट, रवी टेकाळे, भागवत ताकट, बीभिषण जाधव, रंजीत ऊफाडे, विलास ताकट, निवृत्ती डांगे, गणेश ताकट, लिंबाजी भोसले, लिंबा खामकर, मदन नाईकनवरे सहभागी झाले होते.

# माळेगावात धारदार शास्त्राचा धाक दाखवून साडेचार लाखाचा ऐवज लंपास

**प्रतिनिधी @ केज**



केज तालुक्यातील माळेगाव येथील नवीन प्लॉट वरील वसाहतीत राहणाऱ्या आण्णा कोंडीबा चाळक यांच्या घराचे दार गुरुवारी पहाटे तीन वाजण्याच्या दरम्यान तोडून तोंडाला कपडा बांधलेल्या चौघांनी घरात प्रवेश करुन पती,पत्नीला चाकू सारख्या धारदार शस्त्राचा धाक दाखवून नगदी रोख ७४ हजार रुपयांसह एकूण ४लाख ४४ हजार रुपयांचे दागिने व ऐवज चोरून नेल्या प्रकरणी युसूफ वडगाव पोलिसात चार ते पाच अनोळखी चोरट्या विरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे.

केज तालुक्यातील माळेगाव येथील प्लॉट वरील नवीन वसाहतीत राहणारे आण्णा कोंडीराम चाळक हे शेतकरी आपल्या घरात कुटुंबियांसह झोपले असता गुरुवारी पहाटे तीन वाजण्याच्या दरम्यान घराचे दार तोडून २५ ते ३० वयोगटातील चार अनोळखी तरुण तोंडाला रुमाल बांधून घरामध्ये घुसले.चाकु सारख्या धारदार शस्त्रा ने आण्णा चाळक व त्यांच्या पत्नीला धाक दाखवून कपाटात ठेवलेले एक तोळ्याचे झुंबर जोड,सात ग्रॅमचा नेकलेस,सात ग्रॅम चे मिनी गंठण,पाच ग्रॅमची सोन्याची ठुशी,चार ग्रॅम चे मनी,मंगळसूत्र,पाच ग्रॅमची अंगठी अशा दागिन्यासह,नगदी रोख ७४ हजार रुपये मिळून एकूण ४ लाख ४४ हजार रुपयाचा ऐवज चोरट्यानी लंपास केला.

या प्रकरणी अण्णा कोंडीराम चाळकयांच्या फिर्यादी वरून युसूफ वडगाव पोलिसात गुरुवारी रात्री तोंडाला रुमाल बांधलेल्या चार अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास सहाय्यकपोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे करीत आहेत.

ठसे तज्ञ पथक पाचरण

या प्रकरणी पावसाळी वातावरण असल्यामुळे श्वान पथका ऐवजी ठसे तज्ञाचे पथक पाचरण करण्यात आले होते. त्या दिशेनेही तपास चालु असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

इतर तीन ठिकाणीही चोरीचा प्रयत्न

माळेगाव येथील कपड्याच्या दुकानासह इतर दोन ठिकाणीही चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केला होता.परंतु त्या ठिकाणचे नागरिक जागे झाल्यामुळे तेथील चोरीचा त्यांचा प्रयत्न फसल्याची माहिती गावकऱ्यांनी दिली.

### गुरुवारी अंबाजोगाईत १६ बटू चे उपनयन संस्कार

# ब्राह्मण सभेचा ४८ वर्षांपासूनचां उपक्रम

**प्रतिनिधी @ अंबाजोगाई**

येथील ब्राह्मण सभेच्या वतीने याही वर्षी २९ मे गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता धाकटे देवघर येथे १६ बटू चे उपनयन संस्कार होणार आहेत.अशी माहिती ब्राम्हण सभेचे अध्यक्ष अनिरुद्ध चौसाळकर यांनी दिली. येथील ब्राम्हण सभेच्या वतीने गेल्या ४८ वर्षांपासून उपनयन संस्कार हा उपक्रम राबविण्यात येतो. समाजातील गरीब कुटुंबांना उपनयन संस्काराचा आर्थिक ताण पडू नये. यासाठी ब्राम्हण सभेचे संस्थापक अध्यक्ष स्व. राजाभाऊ चौसाळकर यांनी हा उपक्रम सुरू केला. त्यांच्या निधना नंतर डॉ.गोपाळ चौसाळकर,अनिरुद्ध चौसाळकर यांनी हा उपक्रम सातत्याने सुरू ठेवला. या वर्षी १६ बटू चे उपनयन संस्कार होणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन ब्राम्हण सभेचे अध्यक्ष अनिरुद्ध चौसाळकर यांनी केले आहे.



**प्रतिनिधी @ आष्टी**

अंमळनेर येथील भैरवनाथ विद्यालयात कार्यरत असणाऱ्या विद्यार्थी प्रिय शिक्षक राहुल निकाळजे सर यांना या वर्षीचा पद्मपाणि प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार नुकताच मान्यवरांचे हस्ते बीड येथे प्रदान करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन निकाळजे सर यांना सन्मानित करण्यात आले. हा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल निकाळजे यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

बीड शहरातील पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने मागील १७ वर्षापासून संविधान दिनाचे औचित्य साधून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या गुणी जणांचा पद्मपाणि प्रतिष्ठानच्या वतीने पद्मपाणि राष्ट्रीय, राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. या वर्षीच्या दिल्या जाणाऱ्या विविध राज्य, राष्ट्रीय पुरस्कारसाठी बीड जिल्ह्यासह राज्यातील विविध क्षेत्रातील गुणवंत, कर्तुत्ववान गुणीजणाची निवड करण्यात आली होती. यामध्ये राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी आष्टीचे सुपुत्र भैरवनाथ विद्यालयाचे विद्यार्थी प्रिय शिक्षक राहुल निकाळजे यांची निवड करण्यात आली होती.

या मानाच्या पुरस्काराचे वितरण बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये भव्य दिव्य कार्यक्रमात थाटामाटात विजयराज बब, बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे, जिल्हा न्यायालयाचे ज्येष्ठ विधीज्ञ जयंत राख, वाहतूक शाखेचे जिल्हा पोलीस निरीक्षक सुभाष सानप, उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, प्राथमिक शिक्षण विभागाच्या उपशिक्षणाधिकारी मैनाताई बोराडे मॅडम, वडवणीचे गटशिक्षण अधिकारी बाबासाहेब उजगरे, शालेय संस्थाचे अध्यक्ष उत्तम पवार, शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा यशवंत विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक गणेश वाघ, शिरूर तालुक्यातील ज्येष्ठ साहित्यिक विठ्ठल जाधव, महाविद्यालय खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा साहित्यीक गौतम गायकवाड, पद्मपाणि प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष दिलीप तरकसे, प्रतिष्ठानच्या सचिव सिंधुताई तरकसे, सामाजिक कार्यकर्त्या सीमा ओस्तवाल, समाज कल्याण वरिष्ठ निरीक्षक सहाय्यक आयुक्त कविता गायकवाड, महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष नवनाथ पोटभरे, चंपावती विद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य हौसराव पवार, रायमोहाचे सरपंच तथा उद्योजक सुभाष क्षीरसागर, भागवत वैद्य, ड. राजेश तांगडे, प्राचार्य देवीदास निकाळजे, ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार इंगळे, शासकीय निवासी आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका अस्मिता जावळे या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते देऊन राहुल निकाळजे यांना सन्मानित करण्यात आले. राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्या बद्दल निकाळजे सर यांचे भैरवनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक मित्र आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, नातेवाईक, मित्रपरिवार यांनी अभिनंदन केले आहे.



# नायगाव येथे २९ रक्त दात्यांनी केले रक्तदान

### मांजरा विकासप्रतिष्ठान चा सामाजिक उपक्रम

**प्रतिनिधी @ केज**

केज तालुक्यातील मोजे नायगाव येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती संभाजी महाराज, महात्मा बसवेश्वर यांच्या संयुक्त जयंती निमित्त मांजरा विकासप्रतिष्ठान च्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालय अंबाजोगाई यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.या शिबिरात २९ रक्तदात्यांनी रक्तदान केले.यामध्ये तरुणांनी विशेषसहभाग नोंदवला होता.शिबिराचे उदघाटन मांजराविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण खोडसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मांजरा विकास प्रतिष्ठानचे संचालक गावातील नागरिक तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.रक्तदान शिबीर यशस्वी करण्या साठी संस्थेचे पदाधिकारी आणि सर्व सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

# साबला येथील पूर्ण शेतशिवार एआरटी संस्थेने केला पाणीदार -सरपंच जनाबाई काकडे




**प्रतिनिधी @ केज**

केज तालुक्यातील मौजे साबला येथील पूर्ण शेतशिवार पाणीदार करण्याचे काम क्शन रूरल टेक्नॉलॉजीसंस्था यवतमाळ या संस्थेने केले आहे.साबला ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ.जनाबाई काकडे यांच्या विनंतीला मान देऊन एआरटी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. सुहासराव धस,जल संधारणतज्ञश्री.पवनराव नखाते,प्रकल्प व्यवस्थापक वली भाई तांबोळी,प्रकल्प सहाय्यक श्रीमती ज्योती सांबरे,पोकलेन ऑपरेटर सोनुकुमार चंद्रवंशी,दिलीपकुमार चंद्रवंशी या सर्वांच्या नेतृत्वाखाली मौजे साबला येथील नदीच्या पात्राचे खोलीकरण आणि रुंदीकरण त्यामध्ये पाणी अडवण्यासाठी,पाणी जमिनीमध्ये मुरवण्या साठी कमीत कमी पाच फुट व जास्तीत जास्त सात फुट खोल असे बॉक्स बनवण्यात आले आहेत.त्या प्रत्येकबॉक्स मध्ये वीस मिटर अंतरा वर वीस फुट खोल असे बोअरच्या मशिनने बोअर घेतले आहेत. तसेच त्यामध्ये ठराविक अशा अंतरावर साखळी बंधारे बांधण्यात आले आहेत.साबला शेत शिवारात पडलेल्या पावसाचे पाणी साबला शेत शिवारातच राहिले पाहिजे अशा प्रकारचे काम हे एआरटी या संस्थेने केले आहे.हे केलेले काम चांगल्या प्रकारे कसे राहील याची काळजी ही एआरटी संस्थेच्या सर्व कर्मचारी सहकारी कमिटीने केले आहे.या गावातील सर्व शेतकरी,शेतमजूर,प्राणी,पक्षी या सर्वांना याचा फायदा कसा होईल याचा विचार करून निर्णय घेतला आहे. आणि हे सर्व काम व्यवस्थितपणे केले आहे.या कामासाठी सरपंच सौ.जनाबाई नरहरी काकडे यांनीही स्वतःजातीने हजरराहुन लक्ष दिले आहे.काम चांगल्या प्रकारे झाले तर साबला गावातील सर्व नागरिकांना याचा भविष्यात फायदा होईल याची काळजी त्यांनी स्वतः घेतली आहे.साबला ग्राम पंचायतचे सरपंच,उप सरपंच,सर्व सदस्य तसेच सर्व गावकरी यांनी या एआरटीसंस्था, यवतमाळ या संस्थेने केलेल्या कामाबद्दल या संस्थेचे खुपखुप आभार मानले आणि राहिलेल्या कामाबद्दल काम करण्यासाठी विनंती केली आहे.

# आज आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे आस्थिरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन

**प्रतिनिधी @ बीड**

जैन सोशल फेडरेशन, अहिल्यानगर संचलित आनंदऋषीजीहॉस्पिटल,जालना रोड,शाहू बँके जवळ,बीड येथे रविवार दिनांक २५ मे रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत आस्थिरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरामध्ये मनके व सांधे बदली,गुडघेदुखी, पाठदुखी,कंबरदुखी यांसारख्या अस्थिरोगां वर तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत. महागडच्या वैद्यकीय सेवेमुळे सर्वसामान्य रुग्णांना अडचण येऊ नये यासाठी अत्यल्प दरात उच्च दर्जाची सेवा देण्याचा उद्देश या शिबीरामागे आहे.या शिबीरात संपूर्ण गुडघा व खुबा प्रत्यारोपण फक्त ६५,००० रुपये या किमतीत,गुणवत्तापूर्ण इम्प्लांटसह उपलब्ध असणार आहे.तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे.शिबीरात प्रसिद्ध अस्थिरोग सर्जन डॉ. रोहन धोत्रे अहिल्या नगर व त्यांच्या सहकारी तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. तपासणीसाठी नोंदणी शुल्क केवळ १०० रुपये ठेवण्यात आले असून मो. ८२६२००९०९१ या क्रमांकावर संपर्क साधून नोंदणी करता येईल.वेळेअभावी नोंदणी करू न शकलेल्या रुग्णांचीही तपासणी केली जाणार आहे.सर्व बीडकर व परिसरातीलनागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# कोयाळ येथे सर्पदंशाने सख्या भावंडांचा दुर्दैवी मृत्यू

**प्रतिनिधी @ धारूर**

तालुक्यातील कोयाळ गावात एक हृदयद्रावक घटना घडली असून, सर्पदंशामुळे एका कुटुंबातील सख्या भावंडांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी मध्यरात्री घडली . त्यांना परळी येथील खाजगी रुग्णालयात नेहण्यात आले परंतु यश आले नाही .

धारूर तालुक्यातील कोयाळ येथील प्रति मधुकर मुंडे हे गावाच्या पूर्वेस एक किमी अंतरावर शेतामध्ये पत्र्याचे शेडमध्ये राहतात .ऊसतोड कामगार कुटुंब असून घरची परिस्थिती हालाखीची आहे .शुक्रवारी मध्यरात्री १२ ते १ वाजण्याच्या सुमारास प्रदिप मुंडे हे पत्नी तीन मुलासह घरी झोपले होते . या वेळी अचानक मुलगी कोमल वय ७ हीस काहीतरी चावल्याच्या आवाजाने ओरडली .तिला रुग्णालयात नेण्यासाठी जीपमध्ये बसवत असतानाच पुन्हा मुलगा शिवम वय ५ हा ओरडला .यावेळी आई-वडिलांनी पाहिले असता त्यांना साप दिसला .दोघांनाही सार्प दंश झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ परळी येथील खाजगी रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला .परंतु मुलीच्या जागीच मृत्यू झाला होता .काही अंतरावर गेल्यावर मुलगा शिवम यांचाही मृत्यू झाला .रुग्णालयात नेले परंतु डॉक्टरांनी दोघांनाही मृत्यू झाल्याचेही घोषित केले . दोन्ही मुलावर शनिवारी दुपारी कोयाळ येथे अंत्यसंस्कार करण्यात आले .या घटनेमुळे मुंडे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर पसरला आहे .प्रदीप मुंडे यांना तीन मुले होती .तर मोठा मुलगा होता तर कोमल आणि शिवम हे लहान होते .या घटनेमुळे कोयाळ परिसरात हळूहळू व्यक्ती केली जात आहे



## छावा महाराष्ट्र सेनेच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हाप्रमुखपदी साईनाथ कर्डिले

**प्रतिनिधी @ पैठण**

छावा महाराष्ट्र सेनेची नुकतीच पैठण येथे दि.११ मे रोजी महत्वाची बैठक पार पडली.या बैठकीत मराठा आरक्षण,सहकार,शेतकरी, आरोग्य,शिक्षण,कामगार व संघटनेचे ध्येयधोरणे व विविध आंदोलन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.याप्रसंगी सामाजिक चळवळीतील साईनाथ कर्डिले यांची जिल्हाप्रमुख पदी सर्वानुमते निवड जाहीर करण्यात आली.

या निवडीचे नियुक्ती पत्र छावा महाराष्ट्र सेनेचे प्रमुख किशोर पाटील शिरवत यांच्या हस्ते देण्यात आले. तसेच उर्वरित पदाधिकारी प्रवेश सोहळा व नियुक्ती पत्र कार्यक्रम घेण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे लवकरच विभागीय बैठक घेणार असल्याची माहिती छावा सेना प्रमुख किशोर पाटील शिरवत यांनी दिली.यावेळी मराठवाडा अध्यक्ष मनोज मुरदारे,जालना जिल्हाप्रमुख राम पाटिल माने,किरण काळे,अशोक टेके,संतोष कुशेकर,संजय मरकड,फिरोज पटेल,शेखर मात्रे यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# अंबड शहराचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटणार !

### जायकवाडीतून लवकरच स्वतंत्र पाणीपुरवठा योजना - आ.नारायण कुचे

**प्रतिनिधी @ अंबड**

अंबड शहराच्या स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेसाठी जायकवाडी धरणातून पाणी राखीव करण्याबाबतचा शासन आदेश निर्णय गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ नुकताच काढला आहे. आ.नारायण कुचे यांच्या प्रयत्नातून सुवर्ण जयंती नगर उत्थान योजनेमधील स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेच्या उभारणीमधील पहिला महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. यामुळे येत्या वर्षभरात अंबड शहराला स्वतंत्र योजनेतून पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. अंबड शहराचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटणार आहे.



याबाबत आमदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष नारायण कुचे यांनी आज दि.२४ शनिवार रोजी जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकात ही माहिती दिली. या पत्रकात म्हटले आहे की, सुमारे दीडशे कोटी रुपये खर्च असलेली जायकवाडी अंबड पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव सुवर्ण जयंती नगरउत्थान मधून मंजूर करण्यात आलेला आहे. मात्र, धरणातील संबंधित योजनेचे पाणी राखीव करणे हे या योजनेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. यासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून या विषयात आपण विविध स्तरावर पाठपुरावा करत होतो. दि.२२ मे रोजी गोदावरी पाटबंधारे विभागाने संबंधित प्रस्तावाला मंजुरी दिली. यामुळे वर्षभरात अंबड शहराला नवीन योजनेतून सुरळीत पाणीपुरवठा करणार असा विश्वास आ.नारायण कुचे यांनी पत्रकात व्यक्त केला. जायकवाडी पाटबंधारे विभागाने २.८७ दशलक्ष घनमीटर पाणी अंबडच्या स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेसाठी राखीव केले आहे. यामुळे शहराला आता स्वतंत्र जलशुद्धीकरण केंद्र व शहरांतर्गत जलवाहिनी, जलकुंभ यांचे कामे लवकरात लवकर सुरू करण्यात येणार आहे. या सर्व योजनेमुळे शहरातील नागरिकांना दररोज स्वच्छ पाणी देणार असल्याचा विश्वासही तिचे यांनी या पत्रकाच्या माध्यमातून केला आहे. केंद्र व राज्यातील भाजपा सरकारच्या माध्यमातून सर्वांगीण विकासासाठी आपण नागरिकांना दिलेला प्रत्येक शब्द पाळण्यासाठी रात्रीचा दिवस करू असा विश्वासही आ.कुचे यांनी दिला आहे.


# परळीतील रेल्वे उड्डाणपूल २६ ते ३० मे पर्यंत दुरुस्तीसाठी राहणार बंद

### परळी बायपास रोडचा वाहतूकीसाठी वापर करण्याचे आवाहन

परळी /प्रतिनिधी

परळी शहरातील श्यामाप्रसाद मुखर्जी रेल्वे उड्डाणपूल दुरुस्तीसाठी २६ मे ते ३० मे यादरम्यान वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे बीड आणि गंगाखेड तसेच परभणी कडे जाणाया वाहनधारकांनी परळी बायपास रोडचा वापर करावा असे आवहान राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, लातूर यांनी केले आहे.

परळी शहरातील शाम मुखर्जी उड्डाणपूल हा अनेक दिवसापासून दुरुस्त करावा तसेच पूलाचे रुंदीकरण करावे अशी मागणी होत होती. पूलावरील नेहमी पडणा-या खड्ड्यामुळ दुरुस्ती करणे आवश्यक होते. दुरुस्तीचे हे काम २६ मे पासून सुरुवात होणार असून दुरुस्तीसाठी अडथळा निर्माण होऊ नये व काम करताना अपघात होऊ नये यासाठी वाहतूक व्यवस्था टोकवाडीवरून परळी कडे वळवण्यात येणार आहे. तरी वाहनधारकांसाठी पर्यायी मार्ग म्हणून परळी बायपास या मार्गाचा वापर करण्यात येणार आहे. शाममुखर्जी उड्डाणपूलावर नेहमीच वाहतूक कोंडी होत होती. यामुळे समाज माध्यमातून मोठ्या प्रमाणात नाराजी चा सूर येत होता.



२६ ते ३० मे पर्यंत परळी कडे येणाऱ्या सर्व वाहनधारकांनी टोकवाडी, कनेरवाडी, परळी या दिशेने मार्ग खुला राहणार आहे. बीड तेलगाव मार्गे येणाऱ्या तसेच परभणी गंगाखेड कडून परळीला येणाऱ्या अंधारकांनी परळी बायपास रोडचा वापर करावा असे आवाहन राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, लातूरचे उपविभागीय अभियंता श. म. उरगुंडे यांनी केले आहे.

# शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या ६ शाळांचे शालांत परीक्षेत घवघवीत यश

**प्रतिनिधी @ गेवराई**

तालुक्यातील शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या ग्रामीण भागात असलेल्या सहाही माध्यमिक शाळांनी एस.एस.सी. बोर्ड परीक्षेतील निकालाची परंपरा कायम ठेवली असून ग्रामीण भागातील विध्यार्थ्यांनी शालांत परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

दि १३ मे २०२५ रोजी शालांत परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यात शोभादेवी महिला सेवाभावी संस्था गेवराई संचालित असलेल्या अहिल्याबाई होळकर विद्यालय, खांडवी ( १०० टक्के ), राजमाता जिजाऊ विद्यालय, माटेगाव ( १०० टक्के ), राजमाता जिजाऊ विद्यालय, रोहितळ ( १०० टक्के ), राजमाता जिजाऊ विद्यालय, भोगलगाव ( १०० टक्के ), राजमाता जिजाऊ विद्यालय, रानमळा ( ९५ टक्के ), राजमाता जिजाऊ विद्यालय, शेकटा ( ९० टक्के ) असा निकाल नुकताच जाहीर झालेल्या शालांत परीक्षेत लागला आहे. ग्रामीण भागातील या शाळांनी प्रतिकूल परिस्थितीत घवघवीत यश संपादन केल्याने शाळेतील सर्व विध्यार्थ्यांसह, प्रशासकीय अधिकारी तथा मुख्याध्यापक प्रमोद देसले, मुख्याध्यापक केशव तळेकर, मुख्याध्यापक अमोल राजापूरकर, मुख्याध्यापक दीपक गरुड, मुख्याध्यापक अविनाश पंडित, मुख्याध्यापक राजेंद्र क्षिरसागर, व सर्व शिक्षकांचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, संस्थेच्या अध्यक्षा सौ गिरीकाभाभी पंडित, जि.प.सभापती युधाजित पंडित, संस्थेच्या सचिव सौ अनुरूपाताई पंडित, युवानेते यशराज पंडित यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# प्रा.वैशाली यादव यांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान

**प्रतिनिधी @ केज**

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघा तर्फे दिला जाणारा पुणे जिल्हा हिंदी आदर्श शिक्षक पुरस्कार केज तालुक्यातील बनसारोळा येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील हिंदी विषयाच्या शिक्षिका प्रा. वैशाली यादव यांना नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.याप्रसंगी त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष साहेबराव घाडगे पाटील महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाचे अध्यक्ष मिलिंद कांबळे, सचिव रेवणनाथ कर्डिले पुणे विभागाच्या अध्यक्ष डॉ.नेहा बोरसे उपस्थित होते.अहिल्यानगर



जिल्ह्यातील नेवासा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान येथे महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाची दोन दिवसांची कार्यशाळा संपन्न झाली

त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाकडून त्यांनाआदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.अनेक वर्षा पासून हिंदी विषयाचे अध्यापन करत असलेल्या प्रा.यादव मॅडम या विद्यार्थी प्रिय शिक्षिका आहेत.त्यांच्या विषयात यावर्षी शंभर पैकी शंभर गुण घेऊन विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा नावलौकिक केला आहे.आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा. वैशाली यादव यांचे ग्रामविकास शिक्षण प्रसारक मंडळाचेसचिव बालासाहेब काकडे, अध्यक्ष अशोकराव काकडे,कोषाध्यक्ष मुरलीधरराव काकडे, सर्व संचालक, मुख्याध्यापिका सिंधुताई चव्हाण व सर्व सहकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाल्याबद्दल मनस्वी आनंद होत आहे.त्याचबरोबर आणखी चांगले काम करण्याची जबाबदारी सुद्धा वाढली आहे.

प्रा.वैशाली विश्वासराव यादव

आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बनसारोळा ता.केज जि.बीड

# प्रा.शशिकांत पवार यांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान

**प्रतिनिधी @ केज**

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघा तर्फे दिला जाणारा पुणे जिल्हा हिंदी आदर्श शिक्षक पुरस्कार केज तालुक्यातील सावळेश्वर (पै.)चे भूमिपुत्र प्रा. शशिकांत पवार यांना नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.याप्रसंगी त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष साहेबराव घाडगे पाटील,महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाचे अध्यक्ष मिलिंद कांबळे, सचिव रेवणनाथ कर्डिले पुणे विभागाच्या अध्यक्ष डॉ.नेहा बोरसे उपस्थित होते.अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान येथे महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाची दोन दिवसांची कार्यशाळा संपन्न झाली प्रा.शशिकांत पवार हे केज तालुक्यातील सावळेश्वरचे (पै.)चे भूमिपुत्र आहेत.अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत प्रा.शशिकांत पवार यांनी आपले शिक्षण पूर्ण केले आणि मोठ्या जिद्दीने ते शिक्षक झाले.सध्या ते केज तालुक्यातील वसुंधरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पैठण(सा.)या ठिकाणी हिंदी विषयाचे अध्यापन करत आहेत.त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक संघाकडून त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.त्याबद्दल त्यांचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे,कै. भुजंगराव सेवाप्रतिष्ठाण सारणी(आ)अध्यक्ष सौ. सारिकाताई बजरंग सोनवणे,सचिव ड. गोपाळराव कांदे,प्रा.



शिवाजी मांदळे,संतोष रोकडे,भागवत गोरे, प्राचार्य सुशिलकुमार गायकवाड,कुलकर्णी पी.आर,बारसागडे एम. एस,डाके डी.आर, साखरे ए.एम शिनगारे ए.डी,चौधरी ए.एन. तोडकर यु.एम, गायकवाड एन,एम, चौधरी एच.के,सरवदे ए.व्ही,लोकरे डी.ए, वटाणे के.एस,बिक्कड ए.आर,शिनगारे मनोज कल्याणराव,सोनवणे एस.एम,मस्के के.जी, चौधरी यु.एम, गायकवाड ए.पी यांनी अभिनंदन केले आहे.आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित झाल्यामुळे मी खूप आनंदित आहे.मागच्या अनेक वर्षांपासून हिंदी विषयाचे अध्यापन मी प्रामाणिकपणे करीत आहे.हा पुरस्कार माझी आई कै.लक्ष्मीबाई बाळासाहेब पवार यांना समर्पित करतो.प्रा.शशिकांत पवार वसुंधरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पैठण (सा.) ता .केज, जि बीड.

## परळीचे सुपुत्र कृष्णगोपाल तोतला यांची महसूल न्यायाधिकरणाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठावर न्यायिक सदस्य म्हणून नियुक्ती

परळी (प्रतिनिधी)

परळी शहराचे सुपुत्र व ज्येष्ठ न्यायिक अधिकारी श्री. कृष्णगोपाल श्रीनिवास तोतला यांची महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठावर न्यायिक सदस्य (गींवळलळरश्र चशालशी) म्हणून नियुक्ती झाली आहे. महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासनाने २२ मे २०२५ रोजी जारी केलेल्या अधिकृत अधिसूचनेनुसार, ही नियुक्ती महाराष्ट्र भू-राजस्व संहिता, १९६६ च्या कलम ३११ (१) व कलम ३२५ अंतर्गत करण्यात आली आहे.



श्री. तोतला यांनी न्याय क्षेत्रात २८ वर्षांहून अधिक काळ विविध पदांवर कार्य करत न्यायदानाची उज्वल परंपरा पुढे नेली आहे. जिल्हा न्यायाधीश, अतिरिक्त सत्र न्यायाधीश व धर्मादाय आयुक्त अशा महत्त्वाच्या पदांवर त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे.त्यांच्या या नियुक्तीमुळे छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि अहिल्यानगर या १२ जिल्ह्यांना लाभ होणार असून, या विभागातील न्यायप्रक्रिया अधिक परिणामकारक होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.तोतला यांच्या नियुक्तीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# अल्पवयीन मुलीसोबत बळजबरीने विवाह व अत्याचार

### पीडितेच्या तक्रारीवरून शहर पोलिसात गुन्हा

**प्रतिनिधी @ परळी**

परळी शहरातील इंद्रानगर भागात वास्तव्यास असलेल्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस बळजबरीने विवाह करत अत्याचार केल्याची आणखी एक घटना समोर आली असून या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या तक्रारीवरून परळी शहर पोलीस ठाण्यात २२ वर्षीय युवकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस सूत्रांकडून मिळाल्याने माहितीनुसार शहरातील इंद्रानगर भागात राहत असलेल्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस माणिक नगर भागात वास्तव्यास असलेल्या २२ वर्षीय युवकाने दि १७ ऑक्टोबर २४ रोजी आर्या हॉटेल समोरून उचलून नेत पीडित मुलगी अल्पवयीन असल्याचे माहित असतांना देखील तिच्या सोबत नागसेन नगर येथे बौध्द विहार येथे लग्न केले. दि. २५/१०/२०२४ रोजी ते दि.०४/०५/२०२५ या काळात तिच्याशी अनेकदा शारिरीक संबंध करून गर्भवती केले व शिवीगाळ करून मारहाण केली.त्रास असाह्य झाल्याने पीडित अल्पवयीन मुलीने शुक्रवार दि २३ रोजी परळी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात गुरन ११५/२०२५ कलम ६४ (२) (ख), ६४(२) (च्), ११५(२),३५१(१)(२),३५२ इछड सह कलम ४,६,८ पोक्सो कायदा व सहकलम ९ बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ कायद्यानव्ये युवकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी पुढील तपास पिंक पथकाच्या सपोनि जाधवर हे करीत आहेत.

## जालना जिल्ह्यातील नुकसान भरपाई घोटाळ्याप्रकरणी २ उपविभागीय अधिकारी आणि ४ तहसीलदारांना तातडीने निलंबित करा - आ. बबनराव लोणीकर

**प्रतिनिधी @ जालना**

महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आणि परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष लोकप्रिय आमदार बबनराव लोणीकर यांनी जालना जिल्ह्यातील अतिवृष्टी, पूर आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांना मंजूर झालेल्या नुकसान भरपाईच्या अनुदान वाटपात झालेल्या कथित भ्रष्टाचाराच्या प्रकरणी गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणात संबंधित उपविभागीय अधिकारी (अंबड आणि भोकरदन), तहसीलदार (अंबड, घनसावंगी, भोकरदन आणि जाफ्राबाद) यांच्यासह तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांनी बोगस शेतकऱ्यांच्या नावाने कोट्यवधी रुपयांचे अनुदान हडप केल्याचा दावा लोणीकर यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# ओला यांची बदली हा जरी प्रशासनिक भाग असला तरी ! केलेल्या पापाची शिक्षा मिळणार शेवटी अहिल्यानगर कोर्टा दारी !!

अहिल्यानगर (प्रशांत बाफना जिल्हा प्रतिनिधी)

अहिल्यानगर जिल्ह्यात आल्यापासून जिल्ह्यात वेगवेगळ्या कु कारणाने गाजलेले पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची अखेर बदली झाली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक ओला यांची कारकीर्द मात्र अहिल्यानगर च्या इतिहासात सर्वात बोगस अशी राहिल्याचे नागरिकांकडून, जिल्हावासियाकडून आता बोलले जात आहे.

ते जिल्हा पोलीस अधीक्षक असल्यामुळे त्यांच्या विरोधात कोणी बोलत नव्हते मात्र बदली होताच जिल्ह्यातून त्यांच्या खराब कारकिर्तीच्या विषयी आता चर्चा होत आहेत.राकेश ओला हे जिल्ह्यात जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून रुजू झाल्यानंतर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील, अवैध धंदे नियंत्रणात येथील अशी जिल्हा वाशियांना अपेक्षा होती.मात्र तसे झाले नाही. उलट जिल्ह्यामध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती वाढली. लाचखोरी वाढली त्यास नियंत्रण करण्यासाठी राकेश ओला कमी पडले होते. जिल्ह्यामध्ये मटका, जुगार ,अवैध दारू विक्री, अवैध वेश्या व्यवसाय ,अवैध प्रवासी वाहतूक, त्यांच्या काळात आणखी वाढली . शरमेची बाब म्हणजे दक्षिण नगरचे खासदार निलेश लंके यांनी जिल्ह्यात गुन्हेगारी वाढली पोलीस हफ्ते घेतात म्हणून राकेश ओला यांच्या कालावधीतच अहिल्यानगरच्या एस पी कार्यालयासमोर उपोषण करावे लागले होते.

त्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षकांची सर्वत्र थूथु झाली होती. तरीही जिल्ह्यात गुन्हेगारी प्रवृत्ती व अवैध धंदे नियंत्रणात आले नाही. जिल्ह्यामध्ये आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र असणाऱ्या शिर्डी तसेच शनिशिंगणापूर तसेच विविध तीर्थस्थाने, जिल्ह्यातील शहरे येथेही गुन्हेगारी कमी होण्याच्या ऐवजी वाढत गेली. मात्र एखादा दुसरा छापा टाकून मोठा गाजा वाजा करण्यात येत होता. खालचे काही प्रामाणिक पोलीस अधिकारी चांगले कर्तव्य बजावत होते .मात्र अशा पोलीस अधिकाऱ्यांचे नाव पुढे कधी आणले नाही.मात्र हे जिल्हा पोलीस अधीक्षक आपलाच गवगवा करताना दिसत होते. विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र असणाऱ्या शहरात काही वर्षांपूर्वी झालेल्या दुहेरी हत्याकांडात एका कुविख्यात गुंडाविरोधात साक्षीदार म्हणून त्या काळातील सिंघम समजले जाणारे कर्तव्यदक्ष असे जिल्हा पोलीस अधीक्षक कृष्णप्रकाश यांना सामाजिक भान ठेवून कुणीही साक्षीदार होत नसताना जे साक्षीदार झाले .


व या कुविख्यात गुंडांना जेलमध्ये धांडण्याचे काम तत्कालीन कर्तव्यदक्ष जिल्हा पोलीस अधीक्षक कृष्णप्रकाश यांनी त्यामुळे केले होते. त्यानंतर त्या साक्षीदाराला न्यायालयाने दिलेले संरक्षण या जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी जाणीवपूर्वक काढले. त्यांची रिव्हॉल्वर बेकायदेशीर हिसकावून घेतली आणि आपल्या मर्जीतल्या काही बोगस लोकांना पोलीस संरक्षण दिले. हा संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय झाला होता.

असे आपल्या मर्जीप्रमाणे वागणारे जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची बदली आता झाली आहे. प्रशासकीय बदली असली तरी व ते कुठे गेले तरी त्यांनी जिल्ह्यामध्ये असताना आपल्या अधिकाराचा गैरवापर करत एका प्रकरणात महिला व मुलींनाही त्रास दिला. त्यांच्या विरोधात अहिल्यानगर जिल्हा न्यायालयात गुन्हा दाखल होण्यासाठी दावा दाखल आहे. एका पीडित महिलेने थेट जिल्हा पोलीस अधीक्षकांवर गुन्हा जिल्हा न्यायालयात दाखल केल्यानंतर मोठी चर्चा जिल्ह्यामध्ये झाली होती.

जिल्हा पोलीस अधीक्षकांची त्यामुळे मोठी नाच्चक्कीही झाली होती. त्यांनी साम दाम दंड भेद असे अनेक प्रयत्न केलेत कि हि याचिका मागारी घ्यावी परंतु अर्जदार महिलेने प्रण घेतले आहे कि जोपर्यंत आपल्यावर झालेल्या अत्याचाराची सजा ह्या एस पी आणि पोलीस निरीक्षक दिनेश आहेर व इतर पोलिसांवर कारवाई होत नाही तोपर्यंत लढा सुरु राहील साई के नगरीने देर है अंधेरी नही आता ओला त्यांची बदली झाली आहे.बदली झाली असली तरी ते कुठेही गेले तरी त्यांनी त्या महिलेवर व त्यांच्या मुलींवर केलेल्या अत्याचाराचा पाप फेडण्यासाठी यावेच लागणार आहे असे त्यांच्या विरोधात जिल्हा न्यायालयात दावा दाखल करणाऱ्या महिलेने म्हटले असून आपण जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला व पोलीस निरिक्षक दिनेश आहेर आणि अत्याचार करणारे पोलीस यांनी जो आम्हाला विनाकारण त्रास दिला.

त्यामुळे त्यांना त्याचा जाब कोर्टात द्यावाच लागणार असून जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालयाचे खंडपीठ किंवा सुप्रीम कोर्टातही आम्हाला त्यासाठी जावे लागले तरी जाणार! पण या आपल्या अधिकाऱ्याचा गैरवापर करणाऱ्या जिल्हा पोलीस अधीक्षक ओला व संबंधित पोलिसांना त्यांच्या कृत्याची सजा दिल्याशिवाय राहणार नाही.तसा आपण प्रणं केला असल्याचेही एस पी राकेश ओला दिनेश आहेर आणि त्यापोलीस यांच्यावर जिल्हा न्यायालयात गुन्हा दाखल करणाऱ्या या महिलेकडून बोलले जात आहे. कारण हा भारत देश भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधान व कायद्यावर चालतो. या कायद्या पुढे कुणीही मोठा नाही.ज्याने कायदा मोडला त्याला सजा होणारच. त्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षक हे जरी अहिल्यानगर वरून बदली होऊन मुंबईला गेले तरी त्यांना आपल्या गैरवर्तनाचा चा अहिल्यानगरला येऊन जाब जिल्हा न्यायालयात द्यावा लागणार आहे. त्यांची कारकीर्द मोठी खराब राहिली आहे. त्यांचासारख्याअधिकाऱ्यामुळे पोलिसांची व आहिल्यानगर जिल्ह्याची प्रतिमा मालिनझालेली आहे

## अमरण उपोषणाला चौथा दिवस : पूर्णा न.प. मधील बोगस विकासकामांवर कारवाईची मागणी



पूर्णा (प्रतिनिधी)

पूर्णा नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक १,३,व ७ मध्ये करण्यात आलेली विकास कामे ही नियमबाह्य, निकृष्ट दर्जाची आणि भ्रष्ट पद्धतीने करण्यात आल्याचा आरोप करत भ्रष्टाचार विरोधी समितीचे तालुकाध्यक्ष चंद्रमणी रामा लोखंडे यांनी परभणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि. २१ मे पासून आमरण उपोषण सुरू केले आहे या उपोषणाचा तिसरा दिवस असून, अद्याप संबंधित अधिकारी उपोषण स्थळी फिरकले नाही

शहरातील प्रभाग क्र. १ मधील मस्तानपुरा नवी आंबेडकर नगर येथे वसाहत नसलेल्या मोकळ्या जागेवर आर.सी.सी. ड्रेन व सी.सी. रोडचे काम करण्यात आले असून, हे काम काळी मातीवर थातुरमातुर पद्धतीने केल्यामुळे ते कुठल्याही क्षणी वाया जाण्याची शक्यता आहे.

प्रभाग क्र.३ मध्ये मुख्य जलवाहिनी फोडून अनधिकृत नळजोडण्या करण्यात आल्या आहेत. तर प्रभाग क्र. ७ मध्ये अनेक ठिकाणी आर.सी.सी. ड्रेन आणि सी.सी. रोडचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे व नियमबाह्य रितीने करण्यात आले आहे.

चंद्रमणी रामा लोखंडे यांचा आरोप आहे की, या सर्व विकासकामांमुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. संबंधित ठेकेदारांची चौकशी हेमर मशीनच्या साहाय्याने करून, दोषी ठेकेदारांची नावे काळ्या यादीत टाकून त्यांचे नोंदणी परवाने रद्द करावेत व बिल आदा करण्यात येऊ नये आणि त्यांची अमानत रक्कम जप्त करावी, अशी मागणी लोखंडे यांनी केली आहे. उपोषणाच्या चौथा दिवशीही उपोषणस्थळी एकही अधिकारी न फिरकल्यामुळे लोखंडे यांची प्रकृती खालावली असून,प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी, संबंधितावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अन्यथा संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील,असा इशारा लोखंडे यांनी माध्यमांशी बोलताना दिला आहे

## वाणी पिंपळगाव शिवारात अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांनी टाकला छापा

### १३ लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल केला जप्त




परभणी/प्रतिनिधी

पालम तालुक्यातील वाणी पिंपळगाव शिवारात गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपशावर पोलिसांनी धडक कारवाई करत शनिवार (दि. २४) रोजी तब्बल १३ लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याविषयी अधिक माहिती अशी की, पोलिसांचे विशेष पथक क्रमांक तीन यांना गोदावरी नदीपात्रातून वाणी पिंपळगाव शिवारात अवैध वाळू उपसा व वाहतूक होत असल्याबद्दलचे माहिती मिळाली. या माहितीवरून विशेष पथकाने शनिवार सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास धडक कारवाई करत घटनास्थळावरून ट्रॅक्टर, वाळू उपशाचे साहित्य आणि तराफे असा एकूण १३ लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. हि कारवाई विशेष पोलिस पथक क्रमांक - ३ च्या सहाय्यक पोलिस निरिक्षक रामकिशन नांदगावकर, अंमलदार रियाज शेख, विशाल लाड, सय्यद यांच्या पथकाने केली.

## पूर्णेत 'सस्ती अदालत'उपक्रमांतर्गत ४४ प्रकरण निकाली





पूर्णा/ प्रतिनिधी

शेत रस्ते,पांदण रस्ते,शिव रस्त्यांसाठी गावोगावच्या शेतकऱ्यांत असलेले वाद सामोपचाराने मिटवून रस्ते मोकळे करण्यासाठी शासनाच्या वतीने तालुका स्तरांवर सुरु करण्यात आलेल्या 'सस्ती अदालत' उपक्रमांतर्गत शुक्रवारी २३ में रोजी पूर्णा तालुक्यातील तब्बल ४४ प्रकरणे निकाली काढण्यात येथि महसूल प्रशासनाला यश आले असल्याची माहिती तहसीलदार माधवराव बोथिकर यांनी दिली आहे.


पूर्णा तालुक्यातील चुडावा,लिमला, कावलगांव,पूर्णा,ताडकळस,कात्नेश्वर ६ महसूल मंडळातील रखडलेल्या शेत रस्त्यांबाबत तोडगा काढण्यासाठी उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी २३ में रोजी 'सस्ती अदालतीचे' आयोजन करण्यात आले होते.यावेळी मागील ५६ प्रकरणांसह नवे ८१ प्रकरणांसह ११० प्रकरणे सुनावणीसाठी ठेवण्यात आली होती. त्यापैकी ४४ प्रकरण तडजोडी अंती निकाली काढण्यात आली असल्याची माहिती आहे.शुकवारी आयोजित अदालततहसीलदार माधवराव बोथिकर, यांच्या नेतृत्वाखाली सकाळी ९ वाजता सुरू करण्यात आली होती.नायब तहसीलदार प्रशांत थारकर, कृष्णाजी मस्के,पांडुरंग शिंदे, मंडळ अधिकारी,
बी.एस.लटपटे,एस.ए.खुणे,के.पी.शिंदे,श्रीमती शेलगांवकर,घोडके, यांनी काम पाहिले. तर सस्ती अदालत यशस्वीतेसाठी व्यंकटेश जजरवार,तलाठी गणेश गोरे, सुभाष राऊत,सिद्धोधन खिल्लारे,सुधाकर राठोड,कोतवाल मुरली मोरे,आदींनी परिश्रम घेतले.यापुर्वीही येथील महसूल विभागामार्फत ९ में रोजी सस्ती अदालतीत एकूण ३३ प्रकरणांवर सुनावणी करण्यात आली. यापैकी तडजोडी अंती एकूण १२ प्रकरणे निकाली काढण्यात आली होती. आजपर्यंत तालुक्यातील५६ शेत, पांदण,शिव रस्त्याचे प्रकरण निकाली काढण्यात प्रशासनाला यश आले आहेत.तर जवळपास ३४ प्रकरणं स्थळ पाहणीत साठी राखीव ठेवण्यात आली असल्याचे तहसीलदार माधवराव बोथिकर यांनी सांगितले आहे.

## परभणीत प्रभावती नगरात भाजपाकडु स्वच्छता



परभणी (प्रतिनिधी)

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती समारोह सोहळ्या निमित्त शहरातील प्रभावती नगरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.भाजपा महानगर शाखेच्या वतीने शहरातील मंदिरे व परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. प्रभावती नगरात स्वच्छता मोहीम राबवून नवनियुक्त भाजपा महानगराध्यक्ष शिवाजी भरोसे यांचा भाजपाचे संजय कुलकर्णी यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला. यावेळी बाळासाहेब जाधव, कमलकिशोर अग्रवाल, संजय रिजवानी, संजय कुलकर्णी, स्वप्निल पिंगळकर, सौ सुप्रिया मांडे, गणेश जाधव, अनिल रेंगे, संजय जोशी, नितीन शुक्ला, सौ रूपाली ठाकरे, सौ अनिता जोशी, मकरंद मांडे, स्वप्निल किटे, हनुमंत सोमवंशी, ऋषी बारवकर, रोहित वाघमारे आदिसह प्रभागातील नागरिक व भाजपा कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.



## पुढील चार तासांत जिल्ह्यात अवकाळी पाऊस

### प्रादेशिक हवामान केंद्राचा अंदाज

परभणी/प्रतिनिधी

परभणी जिल्ह्यासह हिंगोली जिल्ह्यात पुढील तीन ते चार तासात वादळी वारा, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या अवकाळी पावसाचा अंदाज प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांनी दिला आहे. मागील सलग चार ते पाच दिवसांपासून जिल्ह्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. तर मागील दोन दिवसांपासून परभणी जिल्ह्यात सूर्यदर्शन झाले नाही. आता पुढील तीन ते चार तासांमध्ये संपूर्ण जिल्हाभर वादळी वारा, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज देण्यात आला आहे. त्यामुळे शेतकरी व नागरिकांनी याची नोंद घेण्याचे आवाहन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या ग्रामीण कृषी मौसम सेवा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## आवास येथे वाहिले रक्ताचे 'पाट' जुन्या रागातून सशस्त्र हल्ला एकाची हत्या; तिघे गंभीर जखमी

गडब/सुरेश म्हात्रे

अलिबाग तालुक्यातील मांडवा सागरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आवास गावात गुरुवारी (ता. २२) सव्वा नऊ वाजता भांडणाच्या रागातून चाकू, सुरा, तलवारीसह राणे कुटुंबावर सशस्त्र हल्ला झाला. यामध्ये धर्मेंद्र नंदकुमार राणे (वय ३६, रा. राणे आळी, आवास) यांचा मृत्यू झाला. तर विवेक नंदकुमार राणे, विश्वास नदकुमार राणे आणि करुणा नंदकुमार राणे या तिघांना गंभीर जखमी करण्यात आले आहे. त्यांना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सहा जणांवर गुन्हाः पाच जणांना अटक सशस्त्र हल्ला व खून प्रकरणी देवेंद्र लक्ष्मण म्हात्रे, अंकित अशोक राणे, शुभम संतोष पाटील, वैभव लक्ष्मण म्हात्रे, पुनम देवेंद्र म्हात्रे आणि सिया देवेंद्र म्हात्रे या सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.. त्यापैकी पाच जणांना अटक करण्यात आली असल्याची माहिती मांडवा सागरी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक दीपक भोई यांनी दिली आहे. आरोपी शुभम पाटील याने विश्वास यास पकडून अंकित राणे याने ठारच मारतो, असे बोलून त्याच्या छातीत देखील चाकू भोसकला. फियांदी विवेक नंदकुमार राणे यांना वैभव म्हात्रे यांनी



पकडून आरोपी सिया म्हात्रे यांनी त्यांच्या पाठीमागे कमरेवर सुरा मारला. त्यावेळी त्यांची आई तिला पकडण्याकरिता आली असता, पूनम म्हात्रे हिने विवेक नंदकुमार राणे यांच्या आईच्या मानेवर सुरा मारून गं दुखापत केली.

या सशस्त्र हल्ला व खून प्रक जिल्हा रुग्णालयात दाखल जखमी विवेक नंदकुमार राणे यांनी रुग्णालयातच मांडवा पोलिसांकडे दाखल केलेल्या तक्रारीनुसार मांडवा पोलिसांनी गुन्हा दाखल करुन आरोपींना अटक केली आहे. जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु असल्याचे मांडवा सागरी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक दीपक भोई यांनी सांगितले आहे.

## 'माय छोटा स्कूल' म्हणजे जगाच्या स्पर्धेत मुलांना यशस्वी होण्याचं बाळकडू देणारी शाळा - ना. संजय शिरसाट

प्रतिनिधी @ बीड

### बाळासाहेब पिंगळे यांची संकल्पना नव्या पिढीला दिशा देणारी, पालकांनी या संधीचे सोने करावे

आज जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात स्पर्धा सुरू आहे. प्रत्येक क्षेत्रात रोज नवनवी क्रांती होत आहे. त्याच धर्तीवर शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल घडत आहेत. आपली मुलं जागतिक स्पर्धेत टिकवून रहावीत असे वाटत असेल तर त्या दृष्टीने पालकांना तयारी करावी लागते. पिंगळे सरांच्या संकल्पनेतून साकारलेली माय छोटा स्कूल ही शाळा नव्या पिढीला दिशा देणारी आहे. कारण मुलांच्या बौद्धिक विकासासाठी २ ते १० वर्ष हे वय चांगले मानले जाते. अगदी त्याच वयात मुलांवर योग्य संस्कार करून त्यांना आनंदी वातावरणात शिक्षणाची गोडी लावणारी ही शाळा म्हणजे जागतिक स्पर्धेत टिकवून ठेवणारे बाळकडू म्हटले तर वावगे ठरणार नाही असे प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री ना. संजयजी शिरसाठ यांनी केले.



शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख बाळासाहेब पिंगळे यांनी बीड शहरात नव्याने सुरू केलेल्या माय छोटा स्कूल या शाळेला ना. शिरसाठ यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी शाळेचे कौतुक करताना बोलत होते. यावेळी पटवर्धन साहेब जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळुक, स्वप्निल गलधर, बाजीराव चव्हाण, विपुल पिंगळे, सागर बहीर, चंद्रकांत नवले स्कूलचा प्राचार्या पुजा, मोनिका यांची उपस्थिती होती

पुढे बोलताना ना. शिरसाठ म्हणाले की, देशातील २२०० पेक्षा जास्त शाळांचा हा ब्रँड असून मुलांना जागतिक दर्जाचे शिक्षण देणारी, वल्ड रेकोर्ड पुरस्कार मिळवलेली, डोनेशन आणि ॲडमिशन फिस शून्य असलेली ही शाळा आहे. मुलांच्या बौद्धिक विकासाच्या काळात हसत खेळत, आनंददायी वातावरणात त्यांच्यावर होणारे संस्कार आणि लागणारी शिक्षणाची गोडी ही विद्यार्थ्यांमध्ये पुढे येणारा न्यूनगंड काढून टाकणारी ठरणार आहे. जगात कुठलीच गोष्ट अवघड नाही. फक्त त्यासाठी योग्य नियोजन, तयारी आणि सराव असणे गरजेचे आहे. मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी ही शाळा एक वरदान ठरेल असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

### सुसज्ज इमारत, डिजिटल क्लासरूम पाहून सर्वच भारावले

सीबीएसई बेस असलेल्या या शाळेत प्रशिक्षित शिक्षक वर्ग, बाल संस्कार वर्ग, डान्स, ड्रामा आणि गेम झोन, ब्रेन डेव्हलपमेंट क्लासेस आणि मोफत हॅपिनेस प्रोग्राम सारख्या सुविधा मिळत आहेत. तसेच शाळेची सुसज्ज इमारत व डिजिटल क्लासरुम पाहून सर्वच जण भारावले, तसेच मंत्री शिरसाट यांनी सर्वांचे कौतुक

# कड्यात शिवरायांची नित्य आरती मुस्लिम मावळा समीर शेख यांच्या हस्ते संपन्न

प्रतिनिधी @ आष्टी

शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत, फुले - शाहू - आंबेडकरांच्या विचारांचा वसा आणि वारसा चालवत असलेले, सर्व धर्मसमभाव जपणारे, सामाजिक कार्यकर्ते, शिव मावळा, पत्रकार समीर शेख यांच्या शुभहस्ते दि. २२ मे २०२५ रोजी छत्रपती चौक कडा येथे नित्य आरती कार्यक्रम पार पडला.

त्यांना दिलेला मान म्हणजे एक प्रकारचा त्यांचे सामाजिक कार्याचा गुणगौरवच म्हणावा लागेल. खर तर ज्या रयतेच्या राजाने, परकीयांशी संघर्ष करून जिद्दीने, हिंमतीने शून्यातून स्वतःचे राज्य निर्माण केले. हिंदवी स्वराज्याची स्थापना करून स्वातंत्र्याच्या स्वराज्याचा भगवा रोवला आणि भगवा म्हणजे नुसता झेंडा अथवा निशाणी नाही. भगवा म्हणजे सह्याद्री, भगवा म्हणजे स्वराज्य, हे स्वराज्य निर्माण करताना यावेळी मुस्लिम मावळ्याचे अमूल्य योगदान लाभले. त्यांनी आपल्या राजवटीत धार्मिक सहिष्णुता जपली आणि कोणत्याही धर्माला विशेष प्राधान्य दिले नाही.



सर्व धर्मियांना आपल्या स्वराज्यात मनाचे स्थान दिले. त्यात शिवरायांच्या सैन्यात मदारी मेहतर आणि सिद्धी इब्राहिम हे मुस्लिम सरदार यांच्यासह अनेक सैनिक मोठया संख्येने विविध जबाबदारी सांभाळत होते. हा शिवरायांचा आदर्श विचार मुस्लिम शिवमावळा समीर शेख हा सामाजिक एकता व सर्व धर्म समभाव जपत आपल्या कृतीतून समाजाला दिशा देत आहे. फक्त शिवाजीराजांच्या जन्मदिवशी 'शिवजयंती' ला शिवरायांचा जयघोष करणे सोपे आहे. पण खरी आवश्यकता असते रोजच्या दैनंदिन जीवनात सामाजिक एकोपा आणि समतेचे विचार समाजातील तळागाळातील नागरिकापर्यंत रुजवणे हिच स्वराज्याची खरी प्रेरणा होती. याची आज समाजाला गरज आहे.

हिच त्यांची शिकवण चरित्रातून जाणून घेऊन जनतेच्या दैनंदिन सामाजिक, आयुष्यात कृतीतून विचारात आणणे हेच मोलाचे कार्य समीर शेख या सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून होत आहे. तालुक्याच्या या कानाकोपऱ्यात सामाजिक कामासोबत शिवरायांचा विचार समीर शेख यांच्या माध्यमातून जोपासला जात आहे. यात सामाजिक कार्याची पोहोचपावती म्हणून, नित्य आरतीचा त्यांना मान देऊन त्यांच्या कार्याचा एक प्रकारे कडा येथील ग्रामस्थ व शिवप्रेमींनी एक प्रकारे सन्मानच केला आहे. या सन्मानाने येत्या काळात समाजातील विविध समाज घटकात एकोपा, समता, सर्वधर्म सहिष्णुता जपत, अधिक चांगल्या प्रकारे रुजवण्यासाठी यामुळं नवी उर्जा प्रेरणा निश्चित मिळेल.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या बीड जिल्हा सहसचिवपदी अमोल शिंदे यांची निवड

प्रतिनिधी @ बीड



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत बीड जिल्हा सहसचिव पदी दैनिक लोकमंथनचे बीड जिल्हा प्रतिनिधी अमोल शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या निवडीचे सर्वांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.महाराष्ट्राचे पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक संजयजी भोकरे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंदजी वाकडे सर, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे साहेब यांच्या आदेशानुसार प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली बीड येथील शासकीय विश्रामगृह याठिकाणी शनिवार २४ मे रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकी मध्ये पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगर येथे होत असलेल्या १५ जून रोजी विभागीय अधिवेशन संदर्भात सविस्तर चर्चा झाली. तसेच पत्रकार संघाचा बीड जिल्हास्तरीय मेळावा ५ सप्टेंबर रोजी घेण्याचे निश्चित झाले. यासह विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी सर्वांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या जिल्हा सहसचिव पदी दैनिक लोकमंथनचे बीड जिल्हा प्रतिनिधी अमोल शिंदे यांची निवड करण्यात आली.निवड होताच सर्वांच्या वतीने शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर, बीड जिल्हाध्यक्ष अमजद खान,जिल्हा सचिव शेख वशिम,महिला जिल्हाध्यक्षा शेख आयेशा,बीड जिल्हाध्यक्ष विनायक जाधव,महिला सचिव मोरे अनुप्रिता,पत्रकार संघाचे गेवराई तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे,संघाच्या डिजिटल मिडियाचे जिल्हाध्यक्ष अनिल आगुंडे,केज तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील,वडवणी डिजिटल मीडियाचे तालुकाध्यक्ष सतिष मुझमुले,पत्रकार विष्णू राठोड,सरपंच भास्कर हातागळे, व्यवस्थापक प्रवीण वडमारे,शंकर झाडे,शेख एजाज, सोमेश्वर सोनटक्के, एस. एम. पुसरेकर,अंकुश गवळी यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती गेवराई तालुकाध्यक्ष पदी तुळशीराम वाघमारे यांची निवड



प्रतिनिधी @ बीड

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या गेवराई तालुकाध्यक्षपदी तुळशीराम वाघमारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. निवडीनंतर सर्वांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक संजयजी भोकरे साहेब प्रदेशाध्यक्ष गोविंदजी वाकडे सर प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे साहेब यांच्या आदेशानुसार प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली बीड येथील शासकीय विश्रामगृह याठिकाणी शनिवार २४ मे रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकी मध्ये पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगर येथे होत असलेल्या १५ जून रोजी विभागीय अधिवेशन संदर्भात सविस्तर चर्चा झाली. तसेच पत्रकार संघाचा बीड जिल्हास्तरीय मेळावा ५ सप्टेंबर रोजी घेण्याचे निश्चित झाले. यासह विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी सर्वांच्या उपस्थितीत पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या गेवराई तालुकाध्यक्ष पदी तुळशीराम वाघमारे यांची निवड करण्यात आली.निवड होताच सर्वांच्या वतीने शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर, बीड जिल्हाध्यक्ष अमजद खान,जिल्हा सचिव शेख वशिम,महिला जिल्हाध्यक्षा शेख आयेशा,बीड जिल्हाध्यक्ष विनायक जाधव,महिला सचिव मोरे अनुप्रिता,पत्रकार संघाचे गेवराई तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे,संघाच्या डिजिटल मिडियाचे जिल्हाध्यक्ष अनिल आगुंडे,केज तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील,वडवणी डिजिटल मीडियाचे तालुकाध्यक्ष सतिष मुझमुले,पत्रकार विष्णू राठोड,सरपंच भास्कर हातागळे, व्यवस्थापक प्रवीण वडमारे,शंकर झाडे,शेख एजाज, सोमेश्वर सोनटक्के, एस. एम. पुसरेकर,अंकुश गवळी यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

# माजी आ.भीमराव धोंडे यांच्या अथक परिश्रमातून आष्टीत इंजीनिअरिंग पदवी कॉलेजला मान्यता

## गोरगरिबांसाठी ग्रामीण भागात उच्च शिक्षणाची दारे खुली केल्याने सर्वत्र आनंद

प्रतिनिधी @ आष्टी

गेल्या ४० वर्षापासून सातत्याने आष्टी तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये गोरगरीब सर्वसामान्य शेतकरी आणि कामगारांची मुले शिकावीत हा शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श घेत गावोगावी शाळा, कॉलेज स्थापन करून माजी आ. भीमराव धोंडे यांनी सर्वांगीण विकासाचे द्वार खुले केले आहे. दरम्यान नुकतीच शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थेस इंजिनिअरिंग पदवी कॉलेजची मान्यता मिळाल्याने आष्टी तालुक्यात आनंदोत्सव साजरा केला जात आहे. गेल्या अनेक वर्षापासून माजी आ. भीमराव धोंडे यांनी तालुक्यामध्ये शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून ५० हून अधिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, वरिष्ठ महाविद्यालये, पॉलिटेक्निक कॉलेज, अन्न व कृषी तंत्र महाविद्यालय, बी. एच. एम. एस, बी. ए. एम. एस., बी. पी. एड, बी. एड., डेअरी कालेज, कृषी तंत्र विद्यालय, कृषी महाविद्यालय आदी सह विविध शिक्षण संस्थांच्या रूपाने सर्वसामान्यां साठी स्वावलंबी जीवनाचा मार्ग दाखवला आहे. या त्यांच्या शिक्षण संस्थांमधून हजारो मुले शिक्षण घेऊन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात स्वावलंबी जीवन जगत आहेत. त्यांच्यासह त्यांची पिढी माजी आ. भीमराव धोंडे यांना धन्यवाद देत आहेत. नुकतेच शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ इंजिनिअरिंग कॉलेज या पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता मिळाल्याने माजी आ. भीमराव धोंडे यांची स्वप्नपूर्ती झाली आहे..मात्र भविष्यात कॅन्सर रुग्णालय (५०० खाटांचे १०० कोटी रु.खर्चुन) उभारण्याचा मनोदय असल्याचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी दैनिक समर्थ राजयोगशी बोलताना सांगितले.



दरम्यान, शिक्षणमहर्षी माजी आ. भीमराव धोंडे यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये क्रांती केली आहे. सर्वसामान्यांची मुले योग्य मार्गाला जाऊन सर्व शिक्षण आष्टीसारख्या ग्रामीण तालुक्यात उपलब्ध करून नवा इतिहास रचण्यात आला आहे. नुकताच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद दिल्ली व महाराष्ट्र शासनाच्यावतीने भीमराव धोंडे यांच्या अथक परिश्रमाला प्रतिसाद देत शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ महेश इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आष्टी या पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला मान्यता दिल्याने सबंध तालुक्यातील शिक्षण प्रेमींनी माजी आ. भीमराव धोंडे यांना अभिनंदन करून धन्यवाद दिले आहेत.

मान्यता मिळालेले अभ्यासक्रम स्थापत्य अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी, आर्टिफिसिअल इंटिलिजन्स अँड डाटा सायन्स, प्रत्येकी ६० प्रवेश क्षमता

**५०० खाटांचे कॅन्सर रुग्णालय उभारण्याचा मनोदय!**

माजी आ. भीमराव धोंडे यांचे वडील कै. आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी हे कॅन्सर रोगामुळे मृत्यू पावले. याची सल कायम धोंडे यांच्या मनात आहे आणि म्हणून इथून पुढे परिसरातील एकही कॅन्सर रुग्ण या रोगाने मृत्यू पावला जाऊ नये, यासाठी भविष्यात भव्य ५०० खाटांचे अद्यावत कॅन्सर रुग्णालय उभारण्यात येईल असा मनोदय माजी आ.भीमराव धोंडे यांनी व्यक्त केला आहे.



बीड - सोनार समाज बीड जिल्हाध्यक्ष बाबा पंडीत यांना सोलापूर या ठिकाणी महाराष्ट्र राज्यस्तरीय संत शिरोमणी नरहरी महाराज समाजरत्न पुरस्कार २०२५ मिळाल्या बद्दल सत्कार करतांना ज्येष्ठ मार्गदर्शक शंकर तात्या जगताप,सुरेश तात्या शेटे,झुंजार धांडे,नितीनभैया धांडे,सोमनाथ धांडे,मधुकर धांडे,मुकुंद भालेकर,बाजीराव शिंदे,सरपंच भिकू शिंदे,बाबा पंडीत,चंद्रसेन मन्यारी,अंकुश आगळे,पिंटू ठोंबरे,गणेश तपासे,शरद ढाले,मोतीसिंग राजपूत,ओमप्रकाश कश्यप,सुंदर भोसले,विलास बारस्कर,अमोल कुमकर,नाथा तपासे,शिवाजी सुस्कर व मित्र परिवार,




# रिपाइंच्या वतीने सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचा भव्य सत्कार

प्रतिनिधी @ बीड

सामाजिक न्याय विभागाचे कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट यांचा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या बशीरगंज बीड येथील रिपाइं जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात भव्य सत्कार करण्यात आला.सामाजिक न्याय विभागाचे कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट बीड जिल्हा दौऱ्यावर आले असताना, त्यांनी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या बशीरगंज येथील रिपाइं जिल्हा मध्यवर्ती कार्यालयास आवर्जून सदिच्छा भेट दिली. यावेळी बशीरगंज चौकात जेसीबीने मोठा पुष्पहार घालून त्यांचे रिपाइंच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले.बशीरगंज चौकातुन शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत रिपाइं कार्यालयापर्यंत भव्य रॅली काढण्यात आली. सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांचा रिपाइं कार्यालयात जिल्हाभरातील रिपाइं प्रमुख पदाधिकारी, तालुकाध्यक्ष, महिला आघाडीच्या पदाधिकारी यांनी भव्य सत्कार केला. रिपाइं कार्यालयात भव्य सत्कार प्रसंगी मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, राज्यातील अनुसूचित-जाती, जमातीसाठी असलेल्या योजना प्रभावीपणे राबवित आहोत. रमाई घरकुल आवास योजना, विद्यार्थ्यांची स्वाधार योजना, परदेशी शिष्यवृत्तीसाठी शिष्यवृत्ती योजना यासह महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) माध्यमातून समाजाचे बळकटीकरण करण्यासाठी योग्य पावले आणि निर्णय घेण्याचे काम करीतच, सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांचा लाभ समाज बांधवांना मिळवून देण्यासाठी या पदाच्या माध्यमातून प्रभावीपणे काम करणार आहे.



यावेळी राजू जोगदंड, मझरखान, अनिल जगताप, सचिन मुळूक, बाजीराव चव्हाण, चंद्रकांत नवले, अशोक साळवे, किसन तांगडे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, दीपक कांबळे, सचिन कागदे, महादेव उजगरे, अरुण भालेराव, धोंडीराम सिरसट, लक्ष्मण सिरसट, अरुण निकाळजे, दशरथ सोनवणे, दिपक कांबळे, गोवर्धन वाघमारे, शाहू डोळस, दशरथ शिंदे, रवी जोगदंड, महेश आठवले, प्रमोद दासूद, संदिपान डोंगरे, दिलीप बनसोडे, गौतम बचुटे, उत्तम मस्के,अँड. सुरेश वाघमारे, भगवान ससाने, गणेश लांडगे, हरीश मस्के, मायाताई मिसळे, सलमाभाभी, संगीता जाधव, माया वाघमारे, शोभा गलांडे, राहुल सरवदे, रमेश निशिगंध, विकास मस्के, निलेश ढोबळे, बाळासाहेब ओव्हाळ, अविनाश जोगदंड, विलास जोगदंड, प्रभाकर चांदणे, सुभाष तांगडे ,भैय्या मस्के, शाम वीर, आप्पा मिसळे,दयानंद उजगरे, प्रा. बाळासाहेब गव्हाणे,सतीश शिनगारे, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे,भैय्या साळवे, संजय हनवते, गौतम कांबळे, सोनू वडमारे, धम्मा पारवेकर, महेश कागदे, अविनाश अवघड, नागेश शिंदे,भाऊसाहेब दळवी, भाऊसाहेब कांबळे, किरण खंडागळे, नवनाथ डोळस, भास्कर जावळे, राहुल कांबळे, नामदेव वाघमारे,रामेश्वर खळगे, सिध्दार्थ वाघमारे, देवानंद वाघमारे, विशाल पवार, दयानंद उबाळे, फुलचंद लुचारे, बंडू ठोंबरे, भीमराव घोडेराव यांच्यासह शेकडो रिपाइं कार्यकर्ते उपस्थित होते.